# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००३ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | ९ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ७२**

MAHMAR 19358/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तिसरे / अंक ९ / ऑगस्ट २००३

## संपादकीय

### प्रश्न पाण्याचा आहे !

Rain water harvesting बद्दल आजकाल बरंच काही प्रसिद्ध होत असतं. ठाण्यात या दृष्टीने पावसाच्या पाण्याची शास्त्रशुद्ध साठवण करण्याचे प्रयोगही काही गृहसंकुलांनी सुरू केल्याचे वाचनात आहे. 'पाणी कुठून येतं?' या प्रश्नाचं उत्तर 'नळातून' असं देण्याचे दिवस मागे पडून शहराना, गावांना पाणी पुरवठा करणारे तलाव असतात, त्यातून पाणी वाहून आणलं जातं ते आपल्या नळापर्यंत याचंही ज्ञान सामान्य माणसांना झालं, पण पाणी 'अडवा, पाणी जिरवा' किंवा 'पाणी वाचवा' असं सांगण्याची वेळ यावी एवढा पाण्याचा दुरुपयोग सर्वत्र चालू आहे. या पार्श्वभूमीवर Rain water harvesting या विषयीचीही सामान्यांपर्यंत माहिती पोहचत आहे हे चांगलंच आहे !

याबरोबरच 'पाण्याची बचत-एक संस्कार' या विषयावर शाळा, महाविद्यालयांतून वारंवार बोललं जाणं, शिकवलं जाणं आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालयात नळ नीट बंद न करता पाणी वाहते ठेवणारे विद्यार्थी बरेच असतात. असे उघडे, पाणी वाया घालवणारे नळ पाहिले की विलक्षण वेदना होतात. आपण पुढे होऊन नळ लगेच बंद करतो, किंबहुना आपल्याबाबत ही प्रतिक्षिप्त क्रियाच असते. परंतु पाणी वाया जाणारच नाही याबाबत प्रत्येकाने दक्ष राहिले तरी खूप पाणी वाचू शकेल.

गृह संकुलाच्या आवारात पाणी साठवून ठेवून ते वापरायचं ही कल्पना नक्कीच चांगली आहे. धुंवाधार पावसात कितीतरी पाणी पाण्याचा वापर न होताच गटारांतून समुद्रापर्यंत वहात जाते. अशा पाण्यासाठी शास्त्रशुद्ध पद्धतीने मोठे साठे शहरात तयार झाले तर पाणी पुरवठा करणाऱ्या तलावांवर ताण येणार नाही.

याबाबत मोठाल्या दऱ्यांमध्येही असे साठे निर्माण करता येऊ शकतील का याचा तज्ज्ञांनी शोध घ्यायला हवा. शिवाजी महाराजांच्या काळी वास्तुशास्त्रातील प्रगती इतकी होती की गडागडावर त्यांनी टाक्या निर्माण केल्या. सिंहगड, रायगड असे कोणतेही गड बघा. घळीत पाण्याची टाकी असे. नैसर्गिक व गार आणि बारमाही पाणी. या टाकीतून गडाला पाणी पुरवठा होई. मग हाच प्रयोग आजच्या सिमेंटच्या एका अर्थी गडच म्हणाव्यात अशा इमारतीत का करू नये?

पाणी वाया जाऊ शकेल अशा कोणत्या कृती आपण करतो त्या शोधून प्रत्येकाने स्वत:पासून पाण्याची बचत सुरू केली तर बरेच काही साधले जाईल. पुढील महायुद्धाचे कारण तेल किंवा पाणी असणार आहे, ही अनेक समाजशास्त्रज्ञांची भीती आहे. ही भीती खोटी ठरावयाची असेल तर पाण्याच्या बचतीचा संस्कार बाणवयाला हवा !

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तिसरे / अंक ९ / ऑगस्ट २००३

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टस,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२ ९१
२५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | भगवान श्रीकृष्ण | श्री. शंकर वा. मठ | ३ |
| २) | आणि तरीही मी ! | गीतेश शिंदे | ८ |
| ३) | श्रीमद्भागवत् गीता (अध्याय १७वा) ॥ श्रद्धात्रयविभागयोग: ॥ | आशा भिडे | १३ |
| ४) | ऑर्किडस् - एक कुतुहल | डॉ. मेधा मुळगावकर | २२ |
| ५) | अब्राहम मास्लो आणि संप्रेरण सिद्धान्त | सुषमा पौडवाल | २५ |
| ६) | श्रेष्ठ उर्दु कथाकार : सआदत हसन मंटो | प्रा. चंद्रकांत भोंजाळ | २८ |
| ७) | लंडनमधील सावरकर दर्शन | डॉ. सुधाकर आगरकर | ३१ |
| ८) | परिसरवार्ता | संकलित | ३४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# भगवान श्रीकृष्ण

*या महिन्यात कृष्णाष्टमी आहे. त्या पार्श्वभूमीवर श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्व पैलूंचा विचार मांडणारा हा लेख*

*- संपादक*

### अलौकिक व्यक्तिमत्त्व -

भगवान श्रीकृष्णाचा विचार जितका सखोल करावा तितका तो विलक्षण गुंतागुंतीचा व जटिल होत जातो. भारतवर्षाच्या अनादिकालापासून चालत आलेल्या विशाल सांस्कृतिक जीवनात श्रीकृष्णाच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटलेला दिसतो. या देशातील सांस्कृतिक जीवनाची सर्व अंगे या विभूतिमत्वाने व्यापलेली आहेत. यशस्वी मुत्सद्दी, विजयी योद्धा, धर्म साम्राज्याचा प्रणेता व निर्माता, विकसन होत राहणाऱ्या जीवनाच्या शाश्वत मूल्यांचा रक्षिता आणि महान् तत्त्वज्ञानाचा पुरस्कर्ता इत्यादी बौद्धिक, आध्यात्मिक व तसेच व्यावहारिक स्तरापासून सर्व स्तर श्रीकृष्णाने व्यापलेले आहेत. कोणत्याही प्रकारे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार केला असता त्याच्या व्यक्तिमत्वाची भव्यता व अलौकिकता मनात ठसल्यावाचून राहात नाही.



### चरित्राची भव्यता -

अनेक प्रतिभा संपन्न पंडितांची मति गुंतवून टाकणारा महान् तत्त्वज्ञ, सर्व राजकीय पुरुषांचा अखंड मार्गदर्शक असा महान साम्राज्य निर्माता, दुष्ट जनांचा संहार करणारा, धर्म संस्थापक, तसेच अनेक भाव जगतातील उपासकांचा केवळ प्राण, जीवनमूल्यांचा रक्षणकर्ता, शाश्वतपथ प्रदर्शक, अशा अनेक अंगानी त्याच्या चरित्राकडे पाहू लागावे तसे त्यातील गूढता व व्यापकता या आपल्या विचार सामर्थ्याच्या पलिकडची असल्याचे वाटू लागते. या भव्य जीवनाकडे पाहण्याची दृष्टी अंगी बाणवणे आवश्यक आहे.

### विशाल व्यक्तिमत्त्वाची छाप -

एकदा नारद युधिष्ठिराला म्हणाले - श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वात विविधता आहे.

गोप्यः कामात् भयात् कंसः द्वेष्यात चैद्यादयाः नृपाः ।

संबंधात् कृष्णयः स्नेहात् यूयं भक्त्या वयं विभो ।

गोपी काम भावनेन, कंस भयाने, शिशुपालादी लोक द्वेषाने, यादव व तुम्ही नात्याने व आम्ही भक्तीने श्रीकृष्णाशी संबद्ध झालो व या प्रत्येकाचे कल्याण झाले आहे. श्रीकृष्णाकडे पाहण्याचे सर्व दृष्टिकोन फलदायी ठरतात. साधन योग, भाव जगत्, उपासना इत्यादी सर्व गोष्टी आहेत. श्री रामकृष्ण परमहंस, श्री प्रभूचैतन्य यांच्या सारख्यांच्या अनुभूतीच्या प्रांतातील सत्ये, बाळकृष्णाचे हृदयंगम स्वरूप, कानाला अमृताचा वर्षाव करून, जीवाला मुक्त करणारे, त्याच्या मोहात खेचणारे बासरीचे मंजुळ स्वर, संकटमय परिस्थितीत मानवतेचे रक्षण करणारे व त्यासाठी सुदर्शन धारण करणारे योगेश्वर कृष्ण अशा विविध अंगांनी नटलेल्या व्यक्तिमत्त्वाचे कुणाला बरे आकर्षण वाटणार नाही.

श्रीकृष्णाने कंसाच्या सभेत आगमन केले तेव्हा त्याच्या बद्दल कुणाला काय वाटले याचे हृदयंगम वर्णन

एका कवीने या खालील काव्यात केले आहे. त्यावरून विविधांगी व्यक्तिमत्त्वाची कल्पना येईल.

मल्लानां अशनि: नृणां नरवर: स्त्रीणां स्मरो मूर्तिमान् ।
गोपानां स्वजनो असतां क्षितिभुजां शास्ता स्वपित्रो: शिशु:।
मृत्यु: भोजपते: विराट अविदुषां तत्त्वं परं योगिनाम् ।
वृष्णीनां परदेवतेति विदितो रंगागत साग्रज: ॥

आपल्या मोठ्या भावाबरोबर (बळराम) तो सभागृहात येताच मल्लाना आपल्यावर वज्राघात होता आहे असे वाटले, जन समुदायला एक श्रेष्ठ व्यक्ती असल्याचे वाटले, स्त्रीजनाना मूर्तिमंत मदन प्रवेश करीत असल्याचा भास झाला, गवळी लोकांना स्वत:चा भाऊ वाटला, दुष्ट राजाना एक महाशासक येत आहे असे वाटले, आई-वडिलांना पुत्र आल्याचा आनंद झाला. कंसाला साक्षात् यमच प्रवेश करत आहे असे वाटले, अज्ञानी लोकांना एक विराट पुरुष येत आहे असे वाटले. योगीजनांना श्रेष्ठ तत्त्व समोर येत आहे असे वाटले. वृष्णी कुळातील लोकांना आपले श्रेष्ठ दैवतच आल्याचा भास झाला. प्रत्येकाला अशा प्रकारे श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय झाला.

कृष्णाचे व्यक्तिमत्त्व इतके विशाल व प्रभावी हाते की क्षत्रिय वंशात अनेक योद्धे व बलवान असले तरी श्रीकृष्णाच्या बाबतीत त्याना इतकी खात्री वाटत होती की जिथे श्रीकृष्ण तिथे विजय ठरलेला - यत: कृष्ण: ततो सर्वे यत: कृष्ण ततो जय: । कारण सारेच कृष्णाकडे खेचले जायचे. त्यामुळे विजयाची पताका श्रीकृष्णाच्या बाजूनेच फडफडत असे.

## अखंड सावधानता

१) काही घटनांवरून हे स्पष्ट होईल. हा एक क्षत्रियांचा श्रेष्ठ गुण मानला जातो. श्रीकृष्णाच्या अखंड सावधानतेमुळे पांडवांचे संरक्षण झाले आहे. त्याने भगदत्ताने टाकलेले वैष्णवास्त्र आपल्या छातीवर झेलून निष्प्रभ केले.

२) उद्या सूर्यास्ताच्या आत जयद्रथाला ठार मारीन अथवा न जमल्यास अग्निकाष्ठे भक्षण करीन अशी प्रतिज्ञा करून एक नाजूक परिस्थिती अर्जुनाने निर्माण करू ठेविली. श्रीकृष्ण म्हणाले - अर्जुना तू महान संकटात उगाच सापडलास. जयद्रथाच्या संरक्षणासाठी जय्यत तयारी कौरव श्रेष्ठीने केली आहे. तो तुला दिसणार नाही. सूर्यास्तानंतर तुझा देह पडेल तेव्हा तो बाहेर येईल. श्रीकृष्णाला रात्रभर झोप आली नाही. प्रतिज्ञा पार पाडण्यासाठी दारुकाला सगळ्या गोष्टी सांगून ठेविल्या. दिवसभर युद्ध करूनही जयद्रथ आटोक्यात येत नाही. श्रीकृष्णांनी आपल्या दिव्यशक्तीने अंधार उत्पन्न करून सर्व कौरव सैन्याना भ्रमात पाडले व योग्यवेळी अर्जुनाकडून जयद्रथाचा वध करविला.

३) वासना शक्ती घटोत्कचावर कर्णाला टाकावयास लाविली व अर्जुनाला भयमुक्त केले.

४) भीम कोठे आहे असे धृतराष्ट्राने विचारले असता भीम त्याच्या भेटीस निघाला. श्रीकृष्णानी त्याला अडविले व त्याची लोखंडी प्रतिमा त्या राजासमोर उभी केली. लगेच धृतराष्ट्राने प्रतिमेला जोरात मिठी मारताच त्या प्रतिमेचा चक्काचूर झाला. प्रत्येकाच्या अंत:करणाचे ज्ञान श्रीकृष्णाला होते.

५) अश्वत्थाम्याला नाहीसा केला असता द्रोणाचार्य शस्त्र खाली ठेवतील हे जाणून एक हत्ती मारविला. अश्वत्थामा मेला अशी ग्वाही फिरविली. युधिष्ठिराला खोटे बोलावयास लाविले. त्याच्या वचनावर विश्वासून द्रोणाचार्य शस्त्र संन्यास करते झाले. धृष्टद्युम्नाने त्यांचा तत्काळ शिरच्छेध केला. ही काही सावधगिरीची उदाहरणे.

**श्रीकृष्णाचे प्रेरणादायी जीवन -**

तो दीन दु:खितांचा सहकारी होता. अन्याय त्याला कधी सहन होत नसे. तो आपत्तींमध्ये दुर्बळाचा सहकारी बने. अन्यायाविरुद्ध मदत करणे हे त्याचे ब्रीद होते. माणसाच्या मोठेपणाची पारख इथेच होते. संकटसमयी जो बाजूला उभा राहतो तोच खरा मित्र. 'परमदु:खेनापि दु:खिता विरला' मेघासारखे दातृत्व होते. श्रीकृष्णाचे समग्र जीवन मानवासाठी श्रेष्ठ जगण्याच्या कामामध्ये सहायरुप बनले. त्याचे जीवन आपल्याला नित्य नवीन प्रेरणा देत राहिलेले आहे.

**अलौकिक औदार्य -**

शौर्याबरोबरच इतरही अप्रतिम गुण त्याच्यात होते. त्या गुणांनी त्याला जगाचा हृदय सम्राट बनविले. निर्लोभीपणा व नि:स्वार्थता हे श्रीकृष्णाचे जीवन सूत्र होते. श्रीकृष्णाच्या जीवनात बाळपणाच्या सुरुवातीपासून तो थेट विलय होईपर्यंत कोठेही कसलाही लोभ अथा स्वार्थ पहावयास मिळत नाही. त्याने शिशुपाल, जरासंध यांचा विनाश केला. पण त्यांचे राज्य त्यांच्या राजपुत्रांना परत दिले आहे. त्याचा उद्देश दुष्टांचा नाश करण्याचा होता. एवढे मोठे पराक्रम केले पण स्वार्थाची लेश मात्र गोष्ट नाही. सत्ता व संपती मिळावी यासाठी श्रीकृष्णाने काही केले नाही. 'वेधा द्वेधा भ्रमन् चक्रे कान्तासु कनकेषु च । कनक व कान्ता यांचा मोह त्याला नव्हता. समाजासाठी त्यानी कीर्तीलाही सोडचिठी दिली. जरासंधाशी लढा टाळण्यासाठी तो मथुरेतून बाहेर पडला. मथुरेचा विध्वंस टाळला व स्वत: 'रणछोड' ही अपकीर्ती पत्करली.

**यशस्वी नेता -**

त्याची शक्ती अपूर्व होती. गोवर्धन पर्वताची पूजा व्रजवासियाना करावयास लावून त्याने इन्द्राचे गर्वहरण केले. पापाचरण करणारे व स्वत:ला मोठे समजणारे मानव व सत्ताधीश यांचे निर्दालन केले. असामान्य व्यक्ती असूनही सामान्यात मिसळून जाणारा अद्‌भुत नेता म्हणजे श्रीकृष्ण, शौर्याची प्रतिमूर्ती, राजनैतिक पटुत्व, धारणावृत्ती इत्यादी पाहून श्रीकृष्णासारखी व्यक्ती न भूतो न भविष्यति अशी आहे असेच म्हणावे लागते.

**क्षत्रिय श्रेष्ठ -**

भीष्म अग्र पूजेचा मान कृष्णाला बहाल करताना म्हणाला - या सभेत जेवढे राजे व महाराजे बसलेले आहेत त्या सर्वात श्रीकृष्ण महान आहे. पराभूत केलेल्या एकाही राजाचे राज्य खालसा केलेले नाही किंवा त्यांचे विद्रुपीकरण केलेले नाही. तुमच्यामध्ये त्याच्याशी दोन हात करु शकेल असा कोणीही नाही.

विदुर कौरवाना इशारा देताना म्हणतो - पांडवावर आक्रमण करण्यापूर्वी लाख वेळा विचार करा. आज ते एकटे, अनाथ वा दुबळे नाहीत त्यांच्या पक्षाला श्रीकृष्ण उभा आहे. 'बलवन्तश्च दार्शह वहवश्च विशांपते ।' यत: कृष्ण: तत: सर्वे यत: कृष्ण: ततो जय: । कृष्णाच्या कर्तृत्वाबद्दल केवढा विश्वास.

**अलोट धैर्य - संशय रहितता -**

श्रीकृष्ण अत्यंत धैर्यवान होता त्याच्या इतके धैर्यही इतरात पाहावयास मिळत नाही. मथुरेवर सतरा वेळा जयसंधाने स्वारी केली पण श्रीकृष्ण कधी घावरला नाही. अठराव्या स्वारीच्या वेळी जरासंधाने कालयवनाला पाठविले. तो येत आहे असे पाहून श्रीकृष्ण मथुरा सोडून एकटा गेला. त्याचे कारण दुहेरी होते. या हल्ल्यापासून मथुरा वाचविणे, आपण बाहेर पडलो म्हणजे जरासंध मथुरेऐवजी आपला पाठलाग करील ही त्याला पक्की खात्री होती. हे त्याचे धोरण यशस्वी झाले. तो भीतीने मथुरा सोडून गेला नाही. ती युद्ध नीति होती.

**अलौकिक तेजस्विता -**

लहानात लहान व्यक्तीवरही मी चुकून अन्याय करणार नाही व हवी तेवढी मोठी असली तरी तिचा अन्याय सहन करणार नाही. नम्र वागा, नम्रतेने मोठेपणा दाखविणाऱ्याला तुझ्याहून मी मोठा आहे याचा प्रत्यय दाखवा, हे त्याच्या जीवनाचे सूत्र होते. जुगार खेळीत भर दिवसा कपटाने पांडवांचे राज्य कौरवांनी बळकाविले हे श्रीकृष्णानी सिद्ध करून दाखविले. अन्यायाविरुद्ध लढा देणे हेच त्याचे तत्त्व.

**मर्मज्ञ -**

तो सर्वांचे मर्मस्थान ओळखून होता. कंस, हंस, डिंभक, कालयवन, जरासंध यांचे मर्म ओळखून त्यांचा नाश केला. तसेच भारतीय युद्धात भीष्म, द्रोण, कर्ण यांचेही मर्म स्थान त्याला माहीत होते. द्रोणाचे पुत्रप्रेम, भीष्माचे शिखंडी विरोध, कर्णाची असावधानता यांचा त्यानी युद्धात जरूर उपयोग केला.

**लोक हृदयाचा सम्राट -**

श्रीकृष्णाचे अलौकिकगुण हेच त्याचे अलौकिक नेतृत्व होते. तो असाधारण नेता होता. तो सर्वांना आपला वाटे हेच त्याच्या नेतृत्वाचे मूळ होते. लोकांचा त्याच्यावर विश्वास होता. सुभद्रा हरणाच्या वेळी सर्व यादव संतापले होते. श्रीकृष्णाने एक भाषण केले. कोणी भडकले नाहीत. त्याचे भाषण सर्वांनाच आवडले व शांतपणे त्याच्या बोलण्याप्रमाणे वागले. हा त्याच्या नेतृत्वाचा पुरावा आहे. लोकमानसातील हा खरा सम्राट होता.

**सर्व विद्या पारंगत -**

श्रीकृष्ण कोणत्याही विद्येत अपूर्ण नव्हता. धनुर्विद्येत तो अजोड होता. श्रीकृष्णाने अदृश्य मत्स्याचा वेध करून लक्ष्मणा मिळविली. गदायुद्ध, मल्लयुद्ध, हा तर त्याचा खेळ होता. सांदिपनी गुरुच्या सान्निध्यात, सर्व वेद वेदांग व शास्त्रात प्रावीण्य मिळविले, याचे प्रत्यंतर अर्जुनाला जो गीतेचा उपदेश केला त्यावरून आल्याशिवाय राहात नाही.

**धर्मराज्य संस्थापना पूर्वतयारी -**

राज संस्थेचे शुद्धीकरण हाच धर्म संस्थापनेचा, सांस्कृतिक जीवन मूल्यांच्या प्रतिष्ठापनेचा एक मात्र उपाय भगवान श्रीकृष्णाला दिसून आला. ब्रह्म हे समाजाचे नेतृत्व तर क्षत्र समाजाचे सामर्थ्य. समाजात धर्म टिकावयास दोहोंच्या शुद्धतेची आवश्यकता असते. म्हणून श्रीकृष्ण या कार्यास प्रवृत्त झाला. पांडवात त्याला संघटित नेतृत्व दिसले. शिवाय अपार त्याग, अपार सत्य निष्ठा, धर्माचे नियंत्रण मानण्याची स्वाभाविक प्रवृत्ती इत्यादि गुण विशेष त्यांच्यात एकवटलेले होते. या नेतृत्वाला सिंहासनस्थ करणे हा एकच धर्मसंस्थापनेचा उपाय आहे हे त्याने ओळखले. पांडवांना त्यानी आपल्या कार्याचे साधन म्हणून वापरावयाचे ठरविले. त्यांच्यातील दोष नष्ट करून टाकता येतील, असा श्रीकृष्णाला विश्वास वाटत होता.

या उभयतांची पहिली भेट द्रौपदी स्वयंवराच्या वेळी झाली. त्याच्या पडत्या काळात श्रीकृष्णानेच त्याना आधार दिला. तो पांडवांना भेटण्यासाठी ते राहात त्या कुंभारवाड्यात जातीने गेला व आपला परिचय देऊन त्यांच्याशी संबंध स्वत:हून प्रस्थापित केला. इथे श्रीकृष्णाचे अभिजात नेतृत्व अभिव्यक्त होत आहे. श्रीकृष्णाच्या ठिकाणी नेतृत्वाचे अनेक गुणविशेष आढळतात. अनुचरांच्या अंत:करणात स्वत: विषयी प्रेमाचे, भक्तीचे व आत्यंतिक विश्वासाचे स्थान उत्पन्न करणे ही सर्व प्रथम गोष्ट नेतृत्वाच्या ठिकाणी असणे आवश्यक आहे. ही गोष्ट पांडवात स्वत:विषयी त्यांच्या अंत:करणात श्रीकृष्णाने उत्पन्न केली. आपण स्वत: देखील आपल्या कल्याणाची जी चिंता वाहू शकलो नाही ती चिंता आपला नेता वा सहचर

आपल्याविषयी वाळगतो व अत्यंत बिकट प्रसंगी हाच केवळ आपले मार्गदर्शन करू शकतो. त्याने केलेले मार्गदर्शन केवळ आपल्या हिताचेच असेल, दुसरे कोणीही असे मार्गदर्शन करू शकत नाही असा विश्वास पांडवात श्रीकृष्णाबद्दल निर्माण झाला.

**राजसूय यज्ञ -**

युधिष्ठिर म्हणतो, श्रीकृष्णा हे राजसूय यज्ञ करण्याची माझी इच्छा आहे. पण केवळ इच्छेने हा यज्ञ कोणी करू शकत नाही. याची तुला नीट कल्पना आहे. ज्याच्याजवळ सर्व प्रकारची शक्यता असते त्याच्याविषयी सर्वत्र पूज्यभाव असतो व जो सम्राट आहे तोच राजसूय यज्ञ करू शकतो. माझे सर्व सुहृदय मी हा यज्ञ करावा असे मला सांगतात. पण या विषयातील निश्चय केवळ तुझ्या शब्दानी व्हावयाची आहे.

राज्य प्रस्थापित झाल्यावर युधिष्ठिराच्या मनात राजसूय यज्ञ करावे, असा विचार आला. पांडवाना अर्धे राज्य मिळाले. नव्या राज्याला शोभेशी सुंदर राजधानी निर्माण करून दिली. मग श्रीकृष्ण द्वारकेस गेला. पांडवांचे व यादवांचे विशेष संबंध निर्माण होण्यासाठी सुभद्रा अर्जुनास दिली. त्यासाठी चतुराईने तिचे हरण करावयास लाविले. यादवांना समज दिली व अर्जुनाशी नाते जोडले. हे सारे शिताफीने केले. यामुळे युधिष्ठिराच्या मनात श्रीकृष्णावरल आत्यंतिक विश्वास निर्माण झाला म्हणून श्रीकृष्णाचा शब्द राजसूय यज्ञप्रसंगी अंतिम मानण्याचे ठरवून श्रीकृष्णाला इंद्रप्रस्थात बोलावले. श्रीकृष्णाच्या अनुमतीवाचून एवढ्या मोठ्या गोष्टीस हात घालणे युधिष्ठिराला जमेना. युधिष्ठिराचा प्रस्ताव ऐकून श्रीकृष्णाला आनंद झाला. जरासंधाची एकजूट फोडून टाकण्यास ही संधी फार योग्य आहे असा विचार करून युधिष्ठिराच्या प्रश्नाला उचलून धरले.

श्रीकृष्ण म्हणाला - ही गोष्ट फार चांगली आहे; पण एक मोठा अडथळा आहे. जो पर्यंत जरासंध जिवंत आहे तोवर राजसूय यज्ञ करणे अशक्य आहे. त्यासाठी जरासंधाचा मृत्यू आवश्यक. ८६ राजे जिंकून त्यानी आपल्या बंदिखान्यता टाकले आहे. त्यासाठी जरासंधाचा वध आवश्यक. आणखी १४ राजांना जिंकून १०० राजांना तो महादेवाला बळी देणार आहे. यावर युधिष्ठिर म्हणाला, ही गोष्ट कठीण आहे. त्याचा नाद सोडलेला बरा. श्रीकृष्णाचे लक्ष मानवतेच्या महान मूल्यांच्या संरक्षणावर केंद्रित झाले होते. त्याला जरासंधाचा विनाश अभिप्रेत होता. जरासंध क्रूरकर्मा व अधार्मिक आहे. आपले कार्य भूतदया आणि मूल्यांचे संरक्षण आहे. उघड युद्धात जरासंधाला मारणे कठीण. त्याला ठार मारण्यास झटले पाहिजे. त्याच्या साथीदाराना मी संपविले आहे. उरला केवळ जरासंध. त्याला एकटा गाठून ठार मारले पाहिजे. माझा मुत्सद्दीपणा, भीमाचे बळ, अर्जुनाचे संरक्षण असे आम्ही तिघे त्याच्याकडे जाऊ व काम फत्ते करू, असे श्रीकृष्णाने युधिष्ठिराला पटवून दिले. अर्जुन, भीम व श्रीकृष्ण जरासंधाकडे गेले. त्याची गाठ घेतली. आम्ही तिघांपैकी मल्लयुद्ध कुणाशीही कर असे सांगितले. त्याने भीमालाच निवडले. हे युद्ध अहोरात्र सतरा दिवस चालले. जरासंध थकला. भीमाने पायापासून त्याचे शरीर उभे चिरले व फेकून दिले अशाप्रकारे त्याचा निकाल पटविला. युद्ध न करता त्याचा काटा काढला. त्याच्या मुलाला मगधाच्या गादीवर बसविले. ८६ राजांना बंधमुक्त केले. मगधाने पांडवांचे वर्चस्व मान्य केले. जरासंधाचा मुलगा सहदेव पांडवांच्या बाजूने राहिला. तसेच ८६ राजांचे पाठबळ पांडवांना मिळाले. हा श्रीकृष्णाचा आत्मविश्वास व मुत्सद्दीपणा हे मान्य करावे लागेल.

**शं. बा. मठ**
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

# आणि तरीही मी !

*विज्ञान शाखेतील विद्यार्थी काव्य रसिक असू शकतात. सौमित्रांच्या काव्यसंग्रहाचा हा परिचय वाचून हे पटेल.*

*- संपादक*

कवी सौमित्र रसिकांना काही नवे नाहीत. या आधी त्यांच्या गारव्यातील गीतांनी आपल्याला चिंब भिजवून टाकले आहे. कवी सौमित्र म्हणजेच श्री. किशोर कदम. मनोहर तल्हारांच्या 'माणूस' कादंबरीतील शंकर या आधीच त्यांनी 'पिंपळपान' या मालिकेतून जिवंतपणे साकारला. आताच या मालिकेतील 'पुरुष' या नाटकावर आधरित सिद्धार्थ सुद्धा आपण अनुभवलाच असेल. तसेच गुलजारांच्या 'खराशें' या नाटकातील पात्रही त्यांनी आपल्या अभिनयाने समर्थपणे नटवलं आहे. कवी आणि नट अशा दुहेरी कलात्मकतेने नटलेलं व्यक्तिमत्त्व म्हणजे किशोर कदम अर्थात कवी सौमित्र. गेल्या वर्षीच त्यांचा 'आणि तरीही मी !' हा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झाला. हा काव्यसंग्रह वाचताना चांगल्या वास्तवतेची झालर असणाऱ्या कविता लिहिणं अजून बंद झालेलं नाही असं प्रकर्षाने जाणवलं. त्यांची गारव्याची गीतं तसेच 'अवंतिकेचं' शीर्षक गीत विसरून त्यांच्या काव्यसंग्रहाकडे पाहण्याचा केलेला हा एक प्रयत्न.




'आणि तरीही मी !' हा काव्यसंग्रह चार प्रकारच्या रंगात रंगलेला दिसेल. व्हिन्सेंटच्या कविता, स्पॉटलाईटच्या कविता, सुमित्राच्या कविता व आणि तरीही मी असे या काव्यसंग्रहाचे चार विभाग आहेत. त्यांची कविता चार रंगात विभागलेली असली तरी प्रत्येक कवितेचं एक विशेष अंतरंग आहे. प्रत्येक कवितेचं वेगळं जग आहे, अस्तित्व आहे. प्रत्येक कलाकाराच्या कलासृष्टीत त्याचे स्वतःचे असे एक अनुभवविश्व असते. प्रत्येक कलावंताचे व्यक्तिमत्त्व, त्याचे भावविश्व भिन्न असते. कलावंताचा प्रतिभाधर्म व त्याची अनुभव घेण्याची पद्धती यानुसार कलावंताच्या कलासृष्टीतील अनुभवविश्वाचे स्वरूप, त्याची प्रकृती, मांडणी ही ठरत असते, घडत असते. कलासृष्टीत कलावंताच्या अनुभवविश्वाची प्रकृती सामान्यतः दोन प्रकारची मानली जाते. काही कलावंतांचे अनुभवविश्व हे बहुकेंद्री तर काहींचे एककेंद्री असते. काव्यसृष्टीतही काही कवींची कविता एकाच अनुभव विश्वाभोवती फिरत राहते. त्यांच्या प्रत्येक कवितेत त्याच विषयाची विविध अंगे कविताबद्ध कवी करत असतो. त्यांची प्रतिभा एकाच आशयाभोवती रूंजी घालीत असते आणि त्यात त्याच विषयाची विविध रूपे मूर्त केलेली असतात. अशी कलाकृती ही एककेंद्री म्हणवली जाते. बालकवी व इंदिरा संत यांच्या काव्यसृष्टीतील अनुभवविश्वाची प्रकृती ही एककेंद्री आहे.

या उलट जीवनाच्या विविध अंगावर कविता करणारेही काही कवी आहेत. त्यांची कविता एकाच प्रकारच्या विषयाला बांधलेली नसते. त्यांचे अनुभवविश्व भिन्न भिन्न प्रकृतीच्या आशयांनी व्यापलेले दिसते. अशाप्रकारचे अनुभवविश्व हे बहुकेंद्री असते. केशवसुत,

मर्ढेकर, पाडगावकरांसारख्या कवींची कविता अनेककेंद्री आहे. कवी सौमित्रही त्याच पठडीतले आहेत. त्यांच्या काव्यसंग्रहातून जीवनाचे विविध पैलू विविध अंगाने चित्रित करण्याचा ते प्रयत्न करतात. काव्यसंग्रहातील 'व्हिन्सेंटच्या कविता' या भागात व्हिन्सेंटच्या चित्रमय जीवनाचे ते वर्णन करतात. या कवितेतून व्हिन्सेंटचं दुःखं, रंगांशी एकरूप झालेलं त्याचं जीवन आणि कॅनव्हास व रंग यांच्या सहाय्याने दुःखं कमी करण्याचा केलेला प्रयत्न जाणवतो. या कविता स्वतःच्याच दुःखापुरत्याच मर्यादित न राहता त्यात दुसऱ्यांचेही दुःखं, भावना रंगांसारख्या ओघळतात. चित्र, रंग हे जरी व्हिन्सेंटचं जीवन असलं तरी ते त्याचं जगणं होऊ शकत नाही हे सांगण्याचा प्रयत्न कवी 'तुझाच : व्हिसेंट' (पृ. क्र. ३) या कवितेतून पुढील ओळीतून करतो.

तुझाच,
व्हिसेंट
ता. क. - असो...
पण सध्या...
जगण्यासाठी काही पैसे पाठव....

या प्रकारच्या कवितेंतून कवी जगण्याच्या विविध अनुभूतींचे पोर्ट्रेट रंगवताना दिसतो. व्हिसेंटचे थोडक्यात पण समर्पक चित्रण कवीने या कवितांतून केलेले आहे. कवी या कविता लिहिताना स्वतः व्हिसेंट होऊन जगल्याचे वाचताना जाणवते.

काव्यसंग्रहातील दुसरा भाग म्हणजे 'स्पॉटलाईटच्या कविता' नाटकातील जगणं आणि वास्तवातलं जगणं यातील फरक व एकरूपता दाखविण्याचा प्रयत्न कवितेंतून जाणवतो. कधी जीवनावर नाटकाचं तर कधी नाटकावर जीवनाचं केलेलं रूपक खूप भावतं. आपला रोजचा दिवस हा कोणत्यातरी प्रयोगासारखा असतो, काही ठरवलेलं असतं तर काही अचानक घडतं अशा विविध प्रतिमा या कवितेतून जीवनाचे रूप दाखवतात; 'बिट्वीन द लाइन्स' (पृ. क्र. १८) ही कविता अशाच एका सत्याची कहाणी व्यथित करते. आपल्याला असं नेहमी वाटत असतं की आपल्या जाण्याने कुणाला तरी फरक पडेल, पण वास्तवात मात्र तसं होत नाही. फार तर फार दोन दिवसाचं सुतक लागतं. पण त्यानंतर आपल्याला जगण्यासाठी हात-पाय हे मारावेच लागतात. कुणीही कुणासाठी थांबत नसतं हे पुढील ओळीतून जाणवतं.

उद्या,
दुसऱ्या नाटकाच्या प्रयोगाआधी
दिव्यांना पेटावंच लागेल
जवळचं कुणी गेल्यावर
आपण जगतच राहतो तसं...
खुर्च्या अधीर होतील
जवळंच कुणी गेल्यावर
आपण एकटे राहायला घाबरतो तसं..
स्टेजसुद्धा नव्या सेटला
रांगू देईल आपल्यावर..
जवळचं कुणी गेल्यावर
बळेबळे हसत आजी नातवंडाला
खेळवत राहते तसं....
बिट्वीन द लाइन्स म्हणून जे काही असतं
ते हेच सगळं असावं बहुतेक....

कुणाच्याही जाण्याने जीवन हे संपत नसतं असाही आशावाद कवी येथून व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. कालचक्र हे असच अव्यातपणे सुरू राहतं असंही या कवितेतून कवीला सुचवायचं आहे. याच भागातील 'हरिलाल' ही कविता (पृ. क्र. २३) दूरावत चाललेल्या संबंधांची कहाणी व्यथित करते. ही कविता म्हणजे कवीने 'गांधी विरूद्ध गांधी' नाटकातील केलेलं स्वतःच्या पात्राचंही चित्रण. नाटकाचे शेवटचे तीन प्रयोग सुरू

असताना कवीच्या मनात आलेले विचार येथे जाणवतात. वास्तवात हरिलाल या तीन प्रयोगानंतर कवीला साकारता येणार नव्हता. इतके दिवस नाटकात कवी हरिलाल म्हणून जगला. या हरिलालला आता निरोप कसा देऊ असा कवी इथे प्रश्न विचारतो. नाटकातून हरिलाल साकारता साकारता कवी हरिलालशी एकरूप झालेला आहे आता नाटक संपल्यावर त्या हरिलालशी आपली भेट होणार नाही असं वरून पाहिल्यावर आपल्याला दिसेल. परंतु कवितेच्या अंतरंगाच डोकावून पाहिले की वास्तवात आधीपासूनच माझ्यात एक हरिलाल दडलेला आहे. मग मी या नाटकातल्या हरिलालला निरोप द्यायचा म्हणजे नक्की काय करायचं असं कवी सांगताना आपल्याला जाणवेल.

उद्या - परवा
तू अखेरचा पडदा पाडशील आपल्या दोघांत
आणि चालू लागशील दूरची पायवाट
तेव्हा
बाहेर जाताना लहान मूल जसं मागे लागतं....
तसा मी तुझ्या मागे लागू?
मी तुझ्याकडे काही मागू ?
प्रयोगागणिक मला लहानचा मोठा करत जाणारा तू...
तूच सांग
मी तुला निरोप कसा देऊ?

'एका दिवसाचं शूटिंग' (पृ. क्र. २५) ही कविता शहरातील बकालपणा, भावनाशून्य जगणं याचं चित्रण करते. सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत शहरातील जीवनाचे अनुभव कवीने येथे साकारलेले आहेत. पत्र्यांचे बंगले, पुठ्ठ्यांची घरं, रेल्वेची गांडुळं, अजगरांचे रस्ते ही उदाहरणं कवितेत अगदी समर्पकरीत्या वापरली आहेत. संपूर्ण कॅमेरा दारूच्या बाटलीत अशी कल्पना सुचवताना दारूच्या गुत्याचं, त्यातील झिंगलेल्या चेहऱ्यांचं, तसेच पुरुषावर केलेलं दिवसाचं ही रूपके कवितेत जिवंतपण आणतात.

स्थळ - दारूचा गुत्ता.
वेळ - मध्यरात्रीच्या अलीकडची
किंवा घरी जाण्याच्या पलीकडची.
लेन्स - सोनेरी
कॅमेरा एका दारू भरल्या बाटलीत.
सोनेरी द्रव्यानंतरची काच.
काचेपलीकडे 'दिवसा'चा झिंगलेला चेहरा.
आजूबाजूला लांबट, पसरट, गोल चेहरे.
'दिवस' एका घोटात ग्लास संपवतो.

काव्यसंग्रहाचा तिसरा विभाग म्हणजे 'सुमित्राच्या कविता'. कदाचित किशोर कदमांच्या 'सौमित्र' व्हायला सुमित्रा हीच कारणीभूत ठरली असावी. सुमित्राच्या कविता या फक्त प्रेम कवितांचं नसून तो एक शोध आहे. सुमित्राच्या नजरेनं स्वत:ला शोधण्याचा. सुमित्रामध्ये झालेलं जीवन, प्रेमातील दु:खद वेदना, नातेसंबंधात उरलेला एकतर्फीपणा, एकाकी-प्रतिसाद नसलेलं जगणं अशा प्रकारचे अनुभव कवीने या कवितांतून टिपलेले आहेत. एकलेपण म्हणजे काय हे 'तू उभी रहा इथेच' (पृ. क्र. ३५) या कवितेतून जाणवतं. सुमित्राच्या जाण्याने कवी कसा दुखावला आहे, त्याचं एकलेपण त्याला कसं खायला उठलेलं आहे असं कविता वाचताना जाणवतं. इतरांप्रमाणे सुमित्राही आपल्याला सोडून गेल्याचं दु:खं येथे चित्रीत झालेलं आहे. म्हणून कवी विचारतो, नेहमी इतर माणसं माझीच उपेक्षा का करतात? भरल्या आयुष्यातून मला निराधार का करतात? नेहमी मीच का पोरका होतो? माझ्याशिवाय कुणालाच जर फरक पडत नसेल तर मीच तुमच्या आयुष्यातून निघून जातो, निदान कुणी आपल्याला सोडून गेल्याचं दु:खं तरी जिव्हारी लागणार नाही असा मतित अर्थ नातेसंबंधाबद्दल खूप काही शिकवून जातो. वरील सर्व भाव 'तू उभी रहा इथेच' (पृ.

क्र. ३५) या कवितेतून अगदी अचूक टिपला आहे -

सुमित्रा !
तू उभी रहा इथेच
मी आधी जातो.
म्हणजे मीच तुझ्या आयुष्यातून निघून गेलो
असं होईल
नेहेमी - नेहेमी,
दुसऱ्यांनीच का जायचं
माझ्या आयुष्यातून?

'तुलाही नसेल वाटलं' (पृ. क्र. ५३) या कवितेतून लग्नाआधीची व लग्नानंतरची सुमित्रा कवीने चित्रीत केली आहे. सुमित्राचं लग्न झाल्यावर एकटा पडलेला नायक व सुमित्राच्या आठवणीत खंगत चाललेलं जीवन या कवितेतून जाणवतं. सुमित्राचं आता लग्न झालंय व तिची साधी आठवण काढणं देखील आता त्याला पाप वाटू लागलंय असं म्हणताना कवी पाप म्हणजे काय ते विचारतो. त्यासाठी वापरलेली विविध उदाहरणं पाहिल्यावर सुमित्रा तुटूनही नायकाशी कशी जोडलेली आहे याचं भावनिक चित्र डोळ्यासमोर उभं राहतं. सुमित्राचा व नायकाचा जिव्हाळ्याचा विषय असणारा पाऊस आता सुमित्रेला कसा परका झाला आहे हे पुढील ओळींतून समजतं -

या पावसात
मी चिंब भिजायला उभा राहिलोय्
तुलाही नसेल वाटलं....
मलाही नव्हतं वाटत
की कधी मध्यरात्री
मुसळधार पावसात मी भिजत असेन
आणि सुमित्रा...
कुठल्यातरी तळघरात गाढ झोपी गेलेली असेल
जिथे पावसाचा
साधा आवाजही पोहोचणार नाही कधीच...

हरवलेल्या बालपणाची कहाणी सांगणारी कविता म्हणजेच 'कधीतरी माझ्या डोळ्यांत बघ' (पृ. क्र. ५५). नायक आपलं बालपण, बालपणी न मिळालेलं प्रेम सुमित्रेत शोधतोय हे कवितेचं अंतरंग आहे. येथे 'बाहुली' हा शब्द दोन अर्थाने घेण्यात आला आहे, एक म्हणजे प्रेम किंवा आईपासून दुरावलेलं बालपण आणि दुसरा अर्थ म्हणजे डोळ्यांतील बाहुल्या. अतिशय कमी शब्दात जास्तीत जास्त व्यक्त करण्याची कवीची क्षमता पुढील ओळींतून दिसते.

सुमित्रा !
कधीतरी माझ्या डोळ्यांत बघ
एक छोटसं बाळ दिसेल रांगताना तुला
बाहुलीतल्या बाहुलीत....
मी तुझ्या डोळ्यांत नेहेमीच बघतो
बाहुली हरवलेलं माझं बालपण....

सुमित्राच्या कविता त्यातील आर्ततेमुळे वेगळ्या पातळीला पोहोचतात. कवीचं सुमित्राशी असलेलं नातं हे फक्त प्रेयसीचंच नसून तो त्याची इतर नाती देखील सुमित्रेत शोधतो. सुमित्रेत कवी आपली आई देखील पाहत असतो. कधी कधी ते आई आणि सुमित्रेत इतके गुंततात की ते स्वत:चं गोंधळल्यासारखे होतात. सुमित्रा आई झाल्यावर आपण पोरके झाल्याची खंत देखील कवितेतून जाणवते.

काव्यसंग्रहाचा चौथा व शेवटचा भाग म्हणजे 'आणि तरीही मी !' हे प्रकरण सर्वात दिर्घ असून समाजातील भयाण वास्तवतेची जाणीव या कवितेतून होते. मुंबईतील शहरी, यांत्रिक जीवनाचे अस्सल चित्रण कवीने या प्रकरणातून केलेले आहे. कणा नसलेल्या व झुकण्यातच

समाधान मानणाऱ्या प्रवृत्तीवर कवीने 'स्मशान' या कवितेच्या (पृ. क्र. ८१) पुढील ओळींतून अचूक बोट ठेवले आहे.

'इथं काही लोक झोपले आहेत.

अजूनही मेलेले नाहीत.

झोपले आहेत...

मरून बराच काळ लोटला.

पण मानत नाहीत की मेलेत...

त्यांना वाटतंय् आपण झोपलोय् अजून...'

गणराज म्हणजे महाराष्ट्राचं आराध्य दैवत. परंतु आज गणपती उत्सवाला आलेलं व्यवसायाचं स्वरूप कवीने 'गणपतीचं दुकान...' या कवितेतून चित्रित केलं आहे. आपल्या ऐपतीनुसार प्रत्येकजण गणपतीची मूर्ती खरेदी करतो. प्रत्येक गणपतीची अशी एक विशिष्ट किंमत ठरलेली असते असे वर्णन कवी करताना सांगतो की आज श्रद्धेपेक्षा किंमतीला जास्त महत्त्व आले आहे. विसर्जन झाल्यावर मात्र दुसऱ्या दिवशी किनाऱ्यावर आलेल्या अस्ताव्यस्त मूर्तींना मात्र कुणीच ओळख दाखवत नाही असे अगदी कटू पण खरे वर्णन पुढील ओळीतून समर्पकरीत्या करताना माणसाच्या चाकोरीबद्ध मन:स्थितीचे, भावनांचे चित्रण कवी करतो. - (पृ. क्र. १०५)

भरती आल्यावर ग

भरून जाईल किनारा..

पण तेव्हा कुणीही देणार नाही ओळख

कुठल्याही हाताला, पायाला, सोंडेला...

वेण्यांना, फुलांना, मुकुटांना तुटलेल्या..

'पुढल्या वर्षी लवकर याऽऽऽ'... च्या घोषात

निघालेले काही

येतीलही किनाऱ्यावर दुसऱ्याच दिवशी

ते घोष खरे समजून....

पण मांडव

उखडलेले असतील साऱ्यांचेच...

पाऊस हा आधीपासूनच कवीचा अगदी आवडीचा विषय. पावसावर रूपक साधून दु:खं सांगण्याची पद्धत जुनी असली तरी 'ओळखा पाहू' ही कविता (पृ. क्र. १४६) त्यातील प्रसंगामुळे विशेष वाटते. जखमी झालेला पाऊस, वेशांतर अशी कल्पना कवितेला एक विशिष्ट उंची देते. पावसातही एक दु:खं लपलेलं असतं आणि त्याचं दु:खं मी स्वत:वर ओढवून ते कमी करण्याचा प्रयत्न करतो परंतु वास्तवात माझंच दु:खं खूप मोठं आहे. मग आमच्यातील खरा पाऊस कोण? अशी या कवितेची मध्यवर्ती कल्पना आहे. प्रेम हे या कवितेतील कॅनव्हास असून पाऊस त्यावरील रंग आहेत व या सर्वांच्या मिश्रणातून नायकाचं दु:खं सांगण्याचा प्रयत्न कवीने केलेला आहे -

मग मी बाहेर पडलो

रात्रभर बरसबरस बरसलो कुठेकुठे

सकाळी घरी परतल्यावर पाऊस म्हणाला,

'जा ना साल्या जा...

माझ्यापेक्षा तूच चांगला बरसतोस....'

आता..

माझ्या खोलीत

दगांशिवाय राहणारा 'तो'

आणि हा असा भणंग बरसत फिरणारा मी..

ओळखा पाहू...

खरा पाऊस कोण?

अशा विविध आशयांनी नटलेल्या कवितांचा संग्रह म्हणजे 'आणि तरीही मी !' साचेबंद जीवनाची कहाणी

(पान नं. २१ वर)

# श्रीमद्‌भगवत् गीता (अध्याय १७ वा) ।। श्रद्धात्रयविभागयोगः ।।

(सर्व घराघरांसाठी घरातील सर्वांसाठी 'श्रीमद्‌भगवत् गीता' सर्वांना सहज समजेल अशी)

श्रीमती भिडे यांचा गीतेवरील लेखमालेतील हा १७ व्या अध्यायावरील लेख. - संपादक

या अध्यायाच्या सुरुवातीलाच एक गोष्ट प्रथम सांगून टाकते की गृहस्थाश्रमी लोकांसाठी हा अध्याय महत्वाचा आहे कारण आत्मोन्नती करण्यासाठी पथ्ये व प्रयत्न यात सांगितली आहेत. रजोमयी व तमोमयी श्रद्धेचा त्याग व सत्वमयी श्रद्धेचा आश्रय करणाराच तत्वज्ञानाचा अधिकारी होऊ शकतो. हाच सिद्धान्त १७ व्यात प्रस्थापित केला आहे.

उपनिषद् सांगते आत्मज्ञानाने मोक्ष प्राप्त होऊ शकतो तर गीता सांगते अनन्य भक्तीनेही मोक्ष मिळवता येतो. भक्तीने परमात्मा लाभतो हे भगवंताचे आश्वासनच मानवाला परमार्थाच्या वाटचालीला प्रवृत्त करते. मी निराळा, भगवंत निराळा, लोक निराळे नाही. मी, भगवंत, लोक एकच, परमात्मरूप. प्रत्येकाने निस्पृहपणे स्वधर्मरत असणे हाच सात्त्विक यज्ञ.

'अध्याय १६.२४ या श्लोकातील 'कार्याकार्यव्यवस्थिति' या पदावरून कर्तव्यशास्त्राची म्हणजे नीतिशास्त्राची कल्पना डोळ्यापुढे ठेऊन गीता उपदेशली आहे हे स्पष्ट होते. यासच कर्मयोगशास्त्र असे म्हणतात. गीता हे महाभारताचे रहस्योपनिषद व शिरोभूषण होऊन महाभारत हे गीतेत प्रतिपादलेल्या मूलभूत कर्मतत्वांचे सोदाहरण विस्तृत व्याख्यान आहे. हीच गीता ग्रंथाची अपूर्वता आहे. वेदान्तातील गहन तत्वज्ञानाच्या आधारे 'कार्याकार्यव्यवस्थिति' लावणारा (म्हणजे कर्तव्य कोणते व अकर्तव्य कोणते) हे सांगणारा दुसरा प्राचीन ग्रंथ संस्कृत वाङ्मयात सध्यातरी नाही.' - गीतारहस्यात लो. टिळकांनी गीतेबद्दल असे सार्थ गौरवोद्गार काढले आहेत.



अध्याय १६ व १७ हे परिशिष्ट अध्याय आहेत. त्यात गीतेचे सर्व समाजशास्त्र आले आहे. समाजशास्त्राचा आधार समाजातील व्यक्तींच्या सद्‌वर्तनावर व शुभप्रवृत्तींवर म्हणजेच दैवी संपत्तीवर व त्याला अनुलक्षून शुभकर्मावर (यज्ञ-दान-तप) अवलंबून आहे. सोळाव्यात दैवी व आसुरी वृत्तींचा झगडा पाहिला. मनुष्याचे मनात व त्याचे प्रतिबिंब जो समाज त्या समाजात दोन वृत्तींचा किंवा दोन संस्कृतींचा किंवा दोन संपत्तींचा झगडा अव्याहत चाललेला आहे. त्यातून दैवीचा विकास व आसुरीचा त्याग करावा हे पाहिले. आता सतराव्यात गीता आपल्याला रोजचा कार्यक्रम सुचवीत आहे. नित्य पवित्र, प्रसन्न मनोवृत्ती रहावी अशी इच्छा असेल तर माणसाने आपले वर्तन बांधून घेतले पाहिजे. 'व्यर्थ जाऊ नेदि क्षण' किंवा

"क्षण क्षण काल इकठ्ठा होकर लंबा युग बन जाता है ।
क्षण को क्षुद्र न समझो भाई यह जगका निर्माता है ।
छोटी छोटी जल की बुन्दे सागर को भर देती है ।
बालू रज नन्ही नन्ही सुगर भूमी रच देती है ॥"

या १७ व्या अध्यायाला 'कार्यक्रम योग' असे सुयोग्य नाव विनोबाजींनी दिले आहे. आपले रोजचे दैनंदिन जीवन म्हणजेच आहार, यज्ञ (स्वधर्माचरण), दान, तप

(कायिक, वाचिक, मानसिक) यातून चालत असते. थोडक्यात म्हणजे या अध्यायात गीता आपल्याला आपली रोजची साधीसुधी कर्म अध्यात्मिक दृष्ट्या कशी करावीत हे सांगत आहे. प्रपंच मोक्षदृष्ट्या कसा आचरावा हेही स्पष्ट करून सांगत आहे. सर्व सामान्यासारखे दिसणारे, वागणारे संत पारमार्थिक दृष्ट्या कसे जीवन जगतात, म्हणजेच अंतरप्रतीतिधर्माने त्यांचे पारमार्थिक जीवन कसे वेगळे असते याची कल्पना यावरून येईल.

सूर्य हा ज्ञानी पुरुषांचा गुरु आहे. भगवंतानी कर्मयोग प्रथम सूर्याला सांगितला. सूर्याने मनुस. (म्हणजे विचार करणाऱ्या मनुष्यास) सूर्य स्वतंत्र व मोकळा आहे तरी तो नियमित आहे तसे आपणही आपले जीवन बांधून घेतले पाहिजे.

दैवी व आसुरी असे भेद माणसामाणसात का निर्माण होतात? या प्रश्नाचे उत्तर (७.२०) मागेच देऊन झाले आहे ते आपापल्या प्रकृतीने प्रेरित झालेले असतात. हा अध्याय सांगतांना त्रिगुणांबद्दल सूतोवाच झाले होते पण १४ व्या अध्यायात त्रिगुणांबद्दल सविस्तर सांगून झाल्यावर आता ज्ञान विज्ञान निरुपण करावचे आधी श्रद्धादिकांचे स्वभाव वैचित्र्य कसे उत्पन्न होते हे प्रथम सांगून मग भक्तीमार्गातही भेद का निर्माण होतात तसेच भक्तीमार्गातील प्रमुख विधी इत्यादींचे स्पष्टीकरण आपल्याला या परिशिष्ट अध्याय १७ व्यात मिळणार आहे.

'यत्करोषि यदश्नासि, यज्जुहोषि ददासियत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ ९.२७

'यत्करोषि' म्हणजे जे काही करशील म्हणजेच आहार, यज्ञ, दान, तप

'यदश्नासि' म्हणजे सतराव्यातील 'आहार'

'यज्जुहोषि' म्हणजे सतराव्यातील 'यज्ञ'

'ददाति' म्हणजे सतराव्यातील 'दान'

'तपस्यसि' म्हणजे सतराव्यातील 'तप'

'तत् कुरुष्व मदर्पणम्' म्हणजेच सतराव्यातील 'ॐ तत् सत्' वेद, उपनिषदे, सांख्य वेदान्त, योग हे शास्त्र ग्रंथ आहेत. तसेच गीतेने स्वत:च्या विवेचनासही शास्त्र म्हटले आहे. इति गुह्य तमम् शास्त्रम्' (अ.१५)

सोळाव्याच्या अखेरीला भगवंतानी सांगितले की ज्याला आपले खरोखर कल्याण व्हावे असे वाटत असेल त्याने आपले कर्तव्यकर्म शास्त्राच्या कसोटीवर घासून पाहून त्याप्रमाणे वागणे योग्य आहे. जो याप्रमाणे वागणार नाही म्हणजेच शास्त्राला अनुसरून कर्मे करणार नाही त्याला इहलोकीच काय परलोकही कोणत्याच प्रकारचे सुख मिळत नाही. यावरच अर्जुनाने शंका विचारली त्यातूनच या अध्यायाची सुरवात झाली.

हे श्रीकृष्णा ज्यांच्या ठिकाणी श्रद्धा आहे पण शास्त्रविधी बाबत जे अज्ञानी आहेत त्यांनी कर्म केल्यावर त्यांना कोणती गती मिळते? किंवा त्यांची निष्ठा म्हणजेच मनाची स्थिती सात्विक, राजस की तामस समजायची?

अर्जुनाच्या या प्रश्नाला भगवंत सविस्तरपणे उत्तर देतात. हे वध अर्जुना, जशी ज्याची श्रद्धा तसा तो बनतो आणि प्रत्येक व्यक्तीची श्रद्धा ही त्याच्या प्रकृती स्वभावाप्रमाणे असते. आता प्रकृती स्वभाव म्हणजे अंत:करण (मन + बुद्धी = चित्त आणि अहंकार) अंत:करण सत्व-रज-तम असे त्रिगुणात्मक असते. अंत:करणात या त्रिगुणांचे प्रमाण जसे असेल तसा त्याचा स्वभाव बनतो. प्रकृतीच जड व त्रिगुणात्मक आहे. प्रकृती त्रिगुणात्मक त्यामुळे माणसाचे विचार विश्वही त्रिगुणात्मकच. विकार पण प्रकृतीतून जन्मतात. विचार व विकार म्हणजे स्वभाव आणि स्वभाव म्हणजेच माणसाचे व्यक्तिमत्त्व.

आहार, यज्ञ, तप व दान हेही त्रिविध प्रकारचे असते. विनोबाजी म्हणतात, तीन संस्था बरोबर घेऊन आपण जन्मतो. १) आपल्या भोवती गुंडाळलेले शरीर २) आपण जन्मतो तो समाज (आई, वडिल, भावंडे, शेजारी, समाज व राष्ट्र) ३) भोवतालचे विशाल ब्रह्मांड ही सृष्टी. या

तीन संस्थांचा आपण रोज वापर करतो. त्यामुळे त्यांची झीज होते. म्हणून या तिन्ही संस्थाचे आपण देणे लागतो. ते कर्तव्य आपण यज्ञ, दान, तप या तिन्हींनी मिळून पार पाडू शकतो. यज्ञाने सृष्टीसंस्थेत साम्यावस्था येते, दानाने समाजात व तपाने शरीरात. आपला अहंकार दूर ठेवून आपण या तिन्ही संस्थांसंबंधीचे जन्म-प्राप्त कर्तव्य आपण पूर्ण केले पाहिजे. यज्ञ, दान, तप हे सारेच या ना त्या मार्गाने करीत असतात परंतु त्यांच्या स्वभावाप्रमाणे त्यात फरक पडतो.

शास्त्रविधीचे पालन करून मनुष्य जीवनाचा परमपुरुषार्थ प्राप्त करतो. त्या मानवाच्या, उपासकाच्या योग्यतेचा प्रधान हेतू सात्त्विकी श्रद्धाच होय. म्हणून सतराव्या अध्यायात भगवंत श्रद्धेचे भेद सांगत आहेत. मोक्ष मिळविण्यासाठी नुसती श्रद्धा भागणार नाही. श्रद्धा जरी सर्वत्र दिसून येत असली तरी ती श्रद्धा कोणत्या प्रकारची आहे हे आधी बघायला हवे. श्रद्धा त्रिविध असते. सर्व प्राणिमात्र त्रिगुणांनी बनलेले आहेत. या तीन गुणांपैकी कोणत्या दोन दोन पेक्षा एक गुण जास्त प्रमाणात असतो. त्यामुळे त्या गुणाप्रमाणे त्याची श्रद्धा बनते. एखाद्या ठिकाणी सात्त्विक गुण वरचढ असेल तर त्याच्या श्रद्धेचे रुपांतर ज्ञानार्जन व यज्ञ करावे यात होते. राजसी लोक (रजोगुण वरचढ असणारे), यक्ष (चमत्कार) व राक्षस (उग्रता) यांचे पूजक असतात. (तमो गुण वरचढ असणारे) तामसी लोकांची श्रद्धा प्राणिमात्रांच्या घातपाताचा विचार करते. म्हणून सात्त्विक, राजस, तामस या श्रद्धांपैकी सात्त्विक श्रद्धेचाच मार्ग मुमुक्षूने धरावा. सात्त्विक श्रद्धेचा माणूस शास्त्र वगैरे जाणण्याइतका बुद्धिमान नसला तरी त्याला मोक्ष प्राप्त होऊ शकतो. शास्त्र जाणणाऱ्या पुरुषांच्या मार्गाने तो श्रद्धायुक्त पण अज्ञानी पुरुष जाईल तर तोही ज्ञानी पुरुषाप्रमाणे मोक्षाला निःसंशय जाईल. पण शास्त्रही जाणत नाही व त्याबद्दल श्रद्धाही नाही असे पुरुष संपत्तीच्या जोरावर शास्त्रानुरुप वागणाऱ्यांचा द्वेष करतात व मनाला येईल तसे शास्त्रबाह्य वर्तन करतात. लोकांना त्रास देतात. अशा वागण्याने सर्वांच्या अंतःकरणात असलेल्या मला अत्यंत दुःख होते. वास्तविक अशांचे नावही घेऊ नये. पण त्यांचे नाव टाकण्यापूर्वी ते कशा प्रकारचे लोक आहेत हे पहायला हवे. या दुष्ट लोकांचा त्याग करून सात्त्विक वृत्ती वाढेल असेच आचरण मनुष्याने करावे. सात्त्विक आहार घ्यावा, सात्त्विक कर्मे (यज्ञ-दान-तप) करावीत. म्हणजे मोक्षाच्या वाटेचा वारकरी तो सहज होईल. आहार व वृत्तीचा फार जवळचा संबंध आहे. जसा आहार तसा स्वभाव बनतो. आणि जसा स्वभाव तशी श्रद्धा (आचार व विचार).

श्रद्धा सात्त्विक राजस तामस अशी असते. ती व्यक्तीच्या स्वभावाप्रमाणे असते. जशी ज्याची श्रद्धा तसा तो बनतो. स्वभाव - अंतःकरण (मन-बुद्धि-अहंकार) अंतःकरण सत्व रज तम या त्रिगुणांचे बनलेले. या त्रिगुणांपैकी ज्याचे जे प्रमाण त्या अंतःकरणात असेल तो त्याचा स्वभाव. या स्वभावाप्रमाणे त्याचा आचार. आचार म्हणजेच श्रद्धा (स्थिर विचार) मानव श्रद्धा असणारा प्राणी आहे. तो मनाच्या पातळीवर जगणारा विचार करणारा आहे. जसे त्याचे विचार तसा तो आचार करेल. हे विचार विश्व प्रकृतीचा परिणाम आहे.

विचार व विकार ही प्रकृतीची निर्मिती, विचार व विकार म्हणजे स्वभाव. जसा स्वभाव तसे त्याचे व्यक्तिमत्त्व.

श्रद्धेचे तीन प्रकार सात्त्विक राजस तामस. प्रथम बघू या, सात्त्विक श्रद्धा -

१) आहार - अन्नग्रहण हा संस्कार मनाला घडवीत असतो. म्हणून प्रसन्न व पवित्र वातावरणात अन्नग्रहण करावे. जेवताना मुलांना अभ्यासावरून रागावून बोलू नये. कोणाची उणीदुणी काढू नये. हसत खेळत शांत चित्ताने जेवण करावे. पूर्वी जेवणाच्या आधी 'वदनि कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे । सहज हवन होते नाम घेता फुकाचे । जीवन करी जीवित्वा अन्न हे पूर्णब्रह्म । उदरभरण नोहे जाणिजे यज्ञ कर्म' सीताकान्त स्मरण जयजयराम । पार्वतीपते हरहर महादेव. असा श्लोक म्हणण्याची पद्धत होती. (आज

ते संस्कार इतिहासजमा झालेत.) पूर्वी लग्नात पण हरहर महादेवऽऽ असा नामघोषाचा गजर झाल्यावर मगच पंगतीची जेवायला सुरवात होत असे. अन्नग्रहणाच्या आधी ताटाभोवती तीनवेळा पाणी फिरवून 'चित्रावती' (धरतीला अन्नदान म्हणून पानाच्या उजव्या बाजूला चार छोटे छोटे घास मांडले जायचे. हा संस्कार होता मौंजीबंधनानंतरचा) स्वच्छेने आनंदाने देवाचे नाव घेत स्वयंपाक केला तर अन्नही सात्त्विक, स्वादिष्ट व पवित्र बनते.

सात्त्विक, श्रद्धेचा माणूस सात्त्विक आहारच घेतो कारण आवड गुणांवरच अवलंबून असते. बल, आरोग्य, सुख, शांती, प्रेम वाढवणारा रसपरिपोष करणारा स्निग्ध, समतोल, उत्साह व आनंदवर्धक असाच सात्त्विक माणसाचा आहार असतो.

भगवद्गीता हा अध्यात्मशास्त्राचा ग्रंथ असूनही त्यात आहारशास्त्राचा विचार येण्याचे कारण 'मन अन्नातून तयार होते' असे आपले शास्त्र सांगते. (म्हणून मातांनी बालकांना स्तनपान करताना प्रसन्न व शांत मनाने करावे असे शास्त्र सांगते कारण त्यांचा मुलाच्या मनावर परिणाम होतो.) सात्त्विक अन्नातून सात्त्विक मन तयार होते आणि तशी व्यक्ती त्रिविध तप आचरते.

२) तप - कायिक (शारीरिक), वाचिक व मानसिक अशी तीन तपे असतात. तपाने माणूस अग्नित तापून सोने जसे शुद्ध होते तसा शुद्ध व तेजस्वी होतो.

पातंजल योगाने तप म्हणजे शरीर कष्टवणे असा संकुचित अर्थ दिलेला नाही. तपाचा व्यापक अर्थ मनुने दिला आहे. यज्ञादी कर्मे, वेदाध्ययन, ज्याच्या त्याच्या वर्णाप्रमाणे कर्तव्य. म्हणजे क्षत्रियाने युद्ध, वैश्याने व्यापार वगैरे - गीता रहस्य लो. टिळक.

कायिक तप - देव, द्विज, गुरुजन, विद्वान, माता पिता यांचे पूजन, शुचिर्भूतता, ब्रह्मचर्य, अहिंसा हे शरीर तप

वाचिक तप - सत्यप्रिय, दुसऱ्याला कष्ट न देणारे, हितकर गोड व विनम्र बोलणे, स्वाध्याय अभ्यास हे वाचिक तप.

मानसिक तप - मनाची प्रसन्नता, सौम्यपणा, मौन, मनोनिग्रह आणि शुद्धभावना याला मानस तप म्हणतात.

तपाचा कमी वेळेचा कार्यक्रम म्हणजे व्रत. तपाचरण बारा वर्षे करायचे असते. अहिंसा म्हणजे विनाकारण कोणाला न दुखवणे. रामदास स्वामींनी म्हटले आहे 'परपीडेच मानी सुख । तो एक मूर्ख ।' आपल्या वागणुकीने कोणाला त्रास नाही झाला पाहिजे आणि ब्रह्मचर्य म्हणजे विवाहपूर्व ब्रह्मचर्याचे पालन आणि विवाहोत्तर दंपतीची निष्ठा. विवाह बाह्य संबंधामुळे आज 'एड्स्' सारखे जीवघेणे व किळसवाणे रोग राष्ट्रभर फैलावत आहेत.

तपाने मनुष्य योगी होतो. योगाने परमात्म्याशी जोडला जातो. याचसाठी ही तपे आचरायची. या तपांनी 'भूता परस्परे जडो मैत्र जीवाचे' ही अनुभूती घ्यायची. यासाठी ही तपे फळाची आशा न धरता उत्कट श्रद्धेने व योगयुक्त बुद्धीने मनुष्याने केली तर त्याला सात्त्विक तप म्हणतात. काया, वाचा, मने ही तपे आचरताना त्याबरोबर योगबुद्धी हवीच. योगबुद्धी (चित्ताची समता) 'समत्व चित्ताचे । तेचि सार जाण योगाचे' असे ज्ञानोबा माऊलींने म्हटलेच आहे.

सात्त्विक पूजा - सात्त्विक लोक काया वाचा मनाने देवाची पूजा करतात. आता देव कुठे कुठे पहावा हे दहाव्या विभूतियोगाच्या अध्यायाच भगवंताने सांगितलेच आहे. श्रेष्ठ, थोर, विभुतीच्या रूपात देवच वावरत असतो. 'देव ते संत, संत ते देव जाणा' त्यांची पूजा करा. राम, कृष्ण हे तर प्रत्यक्ष देवच पण ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास, शिवाजी, विवेकानंद, टिळक, सावरकर यासारख्या महामानवांचे 'पूजन' व्हावे. त्यांच्यापुढे नतमस्तक व्हावे. त्यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवावा. आपले जीवन त्यांच्या पायाशी वहावे. हीच या देवाची पूजा. चिंतन-स्मरण व ध्यान ही देवपूजा.

जप व यज्ञानेही देवपूजा होते. ही तर श्रेष्ठ दर्जाची देवपूजा.

३) सात्त्विक यज्ञ - यज्ञ करणे हे आपले कर्तव्य मानून शास्त्रविधीनुसार निष्कामपणे, शांत चित्ताने जो यज्ञ केला जातो तो सात्त्विक यज्ञ होय.

आपण सृष्टीचा वापर करतो त्यामुळे तिची झीज होते ती आपल्या कर्मांनी पुन्हा भरून काढणे म्हणजे यज्ञ. यज्ञाने देवता प्रसन्न होतात. आपण देवांकडून भोग घेतो. परंतु देवाला दिल्याविना भोगू नये. ही गोष्ट आपण विसरलो. सृष्टीचा आपण भोग घेतला. त्यामुळे तिचा समतोल ढळला. तो आपण वृक्षारोपण करून राखला पाहिजे. ढळलेला समतोल पुन: स्थापित करणे म्हणजे यज्ञ! विविध प्रकारच्या प्रदूषणामुळे सृष्टी मलीन होते. ती मलिनता दूर करायला हवी. फळाची अपेक्षा न ठेवता हा यज्ञ करायला हवा. कारण फल आपण आधीच चाखले आहे. तेव्हा हा उपकार नाही तर परतफेड आहे. म्हणून कर्तव्य भावनेने यज्ञ करायला हवा. तोही शास्त्रविधीप्रमाणे.

सात्त्विक यज्ञाने निसर्गाचा तोल राखायचा व दानाने सामाजिक तोल राखायचा.

४) सात्त्विक दान - दान करणे हे आपले कर्तव्य समजून योग्य स्थळ, काळ व पात्र यांचा विचार करून उपकार न करणाऱ्यास जे दान देतात ते सात्त्विक दान होय. उदा. आंधळ्याला नेत्रदान, भुकेलेल्याला अन्नदान.

हेतू - सामाजिक तोल राखणे, आर्थिक विषमता दूर करून आर्थिक समता प्रस्थापित करणे. स्वधर्माने मिळवलेला पैसा स्वधर्मातच योग्य देश, काळ व पात्र पाहून खर्च करणे. यात दुसऱ्याला दान द्यायचे ते सन्मानाने द्यायचे आपले कर्तव्य समजून पुन्हा त्यापासून प्रतिउपकाराची अपेक्षा न ठेवता.

भगवंत राजस तामस या दोन्हींचा त्याग करून सत्त्व गुणांचाच अंगिकार करावा असे सांगत आहेत. सात्त्विक यज्ञ दान व तप शास्त्रविधीचे पालन होते. विश्वातील समता, ब्रह्माची एकता, यांचा प्रत्यय जीवनात ज्या ज्या कर्मांनी येतो त्या (कर्मांना) विधींना अध्यात्मिकदृष्ट्या शास्त्र असे म्हणतात. दानाने समाजात एकत्वाची भावना दृढ होते म्हणून तो ब्रह्मानंदच होय. दानाने देणाऱ्याचे स्वातंत्र्य अबाधित राहते. आर्थिक समता ही आंतरिक एकत्वाचे प्रतिक ठरते. सात्त्विक यज्ञ, तप व दान यात एकत्वाचे भान ठेवले जाते. या सर्वांमुळे सात्त्विक दान सर्वात श्रेष्ठ. इथे अमक्या तमक्याने मला काय दिले होते म्हणून मी त्याला द्यायचे? असा विचारही मनात आणू नये. नेत्रदान व रक्तदान केले तर ते कोणी केले हे कळणारही नाही. म्हणून हे श्रेष्ठ सात्त्विक दान. नाहीतर देणाऱ्याचा अहंकार वाढतो व घेणाऱ्याचे दास्य.

(आहार, यज्ञ, दान, तप याप्रमाणेच ज्ञान, कर्म, कर्ता, बुद्धी, धृती व सुख यांच्या त्रैविध्याचे वर्णन पुढील १८ व्या अध्यायात आले आहे.)

याच यज्ञ दानादिकांचा आचार राजस पद्धतीने कसा होतो ते बघूया.

राजस श्रद्धा -

१) आहार - रजोगुण हा अहंकाराचाच निदर्शक आहे. राजसींचा आहारही अहंकारी मनाची जोपासना करणारा असतो. राजस पुरुषाला तिखट, आंबट, खारट, झणझणीत, अति उष्ण, रुक्ष, दाहक व दु:ख, शोक, रोग उत्पन्न करणारा आहार आवडतो.

सात्त्विक व्यक्तींचे सामर्थ्य ज्ञानात असते तर राजस व्यक्तींचे सामर्थ्य त्यांच्या अहंकारात असते. त्यांचा स्वभाव तापट, तिरसट, रुक्ष (स्वार्थ पहाणारा, इतरात रस न घेणारा) असा असतो. ही माणसे फक्त स्वत:साठीच जगतात. परिणामी ती एकटीच असतात.

२) तप - हे राजस लोक आपला सत्कार व्हावा, आपणास मान मिळावा, आपली सगळीकडे पूजा (वरवर)

व्हावी म्हणून दंभाने जे तप करतात. त्या चंचल अस्थिर तपास राजस तप म्हणतात. जर त्यांना तपाचे फळ मिळाले नाही तर ते सोडूनही देतात. जिथे मानसन्मान मिळेल तेच कार्य हे लोक करतात. राजस व्यक्तींचा श्रद्धा विषयी ईश्वर नसतो. त्यामुळे त्यांच्या हातून लोककार्य झाले तरी ते समाजमनाशी जोडले जात नाहीत.

राजस पूजा - राजस लोक यक्ष (चमत्कार) व राक्षस (उग्रता) यांचे पूजक असतात. एकतर ते यांना मान देतील नम्र होतील नाहीतर स्वतःच चमत्कार व उग्रता यांचा अवलंब करतील. हे चमत्कार पाहून चकित होतात व उग्रता पाहून विनम्र होतात.

यज्ञ - राजस लोक यज्ञ करतात फलप्राप्तीच्यासाठी, ढोंगीपणाने किंवा देखाव्यासाठी करतात. 'अहं' हाच त्यांचा केंद्रबिंदू असतो. कर्तव्य, निष्कामता, ब्रह्मज्ञान वगैरे त्यांच्या गावीही नसते. त्यांची दृष्टी फळावर असल्यामुळे ब्रह्मसाक्षात्कार (समता) त्यांना महत्त्वाचा वाटत नाही. आपणास फलप्राप्ती म्हणजे फायदा झालाच पाहिजे. या दृष्टीकोनातून ते सृष्टीचा वापर करतात. उदा. कारखान्यांसाठी ते नदीचे पाणी घेतात, दूषित पाणी नदीतच सोडतात. त्यामुळे गावाचे आरोग्य बिघडते. पण त्यांना काय त्याचे? ते फक्त त्यांचा फायदाच बघतात. (यज्ञ याचा अर्थ पुन्हा एकदा लक्षात घ्या. ज्ञानेश्वर यज्ञाबद्दल म्हणतात. 'स्वधर्म तोचि बापा । नित्य यज्ञ जाण पा ॥') सृष्टीचा समतोल बिघडतोय हे त्यांच्या ध्यानीही येत नाही ! किंवा त्याचा ते विचारही करीत नाहीत. कारण राजस यज्ञ हा स्व-केंद्रित असतो.

राजस दान - उपकाराची परतफेड व्हावी म्हणून किंवा त्या दानाच्या मोबदल्यात पुढे काही मिळेल या फळाच्या आशेने दान केले जाते त्या दानास राजस दान म्हणतात. पुढारी लोक गरीबांना मते मिळावी म्हणून दान देतात, मजुरांना त्यांनी जास्त राबावे या हेतून दान दिले जाते. काही धर्मांचे लोक औषधे, कपडे यांचा दानधर्म करतात. धर्मांतराचा हेतू समोर ठेवून. ही सारी दाने राजस असतात. स्वार्थी हेतूने केलेली.

अशा रीतीने राजसी श्रद्धेच्या लोकांचे यज्ञ-दान-तप 'अहं केन्द्री' असते. ईश साक्षात्काराचा शास्त्रविधी सोडून भौतिक समृद्धीसाठी, ऐहिक सुखासाठी राजस यज्ञ-दान-तप होत असतात.

आता पाहूया तामस श्रद्धेच्या लोकांचा आहार, यज्ञ, दान, तप.

**तामस श्रद्धा -**

१) आहार - त्यांच्या स्वभावाप्रमाणेच त्यांचा आहार हा अपवित्र, शिळा, नीरस, नासका, उष्टा असा असतो. हे लोक शिळे अन्न परत गरम करून किंवा भाजी, आमटी, भात एकत्र करून त्यात अन्य पदार्थ टाकून त्याची थालीपीठे लावून खातात. (हॉटेलात 'पावभाजी' हा पदार्थ चवीने खाल्ला जातो. झणझणीत, चमचमीत मसाले वापरून त्यात शिळ्या भाज्याही खपवल्या जातात पण ते कोणास कळते? सर्व जण मिटक्या मारत चवीचवीने गरम गरम पावभाजीचा आस्वाद घेतच असतात. शेवटी दृष्टी आड सृष्टी.) जे खाऊ नये पिऊ नये असे शास्त्र सांगते तोच आहार (बघणाऱ्याला किळस येईल असा शिळा पाका, नासका उष्टा) तामस लोक आवडीने खातात. त्यामुळे यातना, दुःख क्लेश त्यांना भोगावे लागतात. अशा आहारातून तामस मन तयार होते.

इथे एक गोष्ट प्रामाणिकपणे सांगावीशी वाटते की 'अन्न हे पूर्णब्रह्म' मानून आम्हीपण सकाळचे अन्न रात्री खातो. तसेच रात्रीचे सकाळी. फ्रीजमध्ये ठेवलेले अन्न खराब होत नाही. पूर्वी पण पाण्यात अन्नाची भांडी झाकून ठेवीत. अन्न जर चांगले असेल तर ते शिळे म्हणून आम्हीपण टाकत नाही. फोडणीचा भात, फोडणीची पोळी कांदा शेंगदाणे टाकून चविष्ट बनवून मला वाटतं घरोघरी सर्वचजण खातात. आपण महागाचे धान्य वापरतो मग ते टाकून का द्यायचे? भगवंतच म्हणतो 'खाऊन माजा पण टाकून माजू

नका.' संपत्तीच्या कैफात अन्न टाकले तर देव देत नाही. गरीब लोक अन्नाविना उपाशी असतात. 'अन्नासाठी दाही दिशा, आम्हा फिरविशी जगदिशा' या वीतभर पोटासाठी सारी यातायात करावी लागते हे पोट पाठी लागलेय ना प्रत्येकाच्या. त्यामुळे आम्ही तामसी वृत्तीचे लोक नाही तरी 'अन्न पूर्णब्रह्म' म्हणून शिळे (नासके नाही) अन्न खातो असे 'गीता विज्ञाननिष्ठ निरुपण' या पुस्तकात डॉ. प. वि. वर्तक यांनी म्हटले आहे. तेवढ्यासाठी कोणी आम्हाला तामसी म्हटले तर म्हणू दे. डॉ. वर्तकांच्या या मतशी मला वाटतं आपण सर्वजण सहमत आहोत नाही का?

**तामस तप -** हे लोकही तप करतात. मुर्खपणशचे, हट्टाने केलेले स्वत:लाच पीडा करून घेणारे व दुसऱ्याची हानी करणारे तप हे तामस तप होय.

काही लोक हट्टाने अशी साधना करतात. उपाशी राहणे, एका पायावर उभे राहणे, त्राटक करणे, काट्यांवर झोपणे, जिभेतून तार घालणे, विस्तवावरून चालणे, अंगावर फटके मारणे वगैरे अशी अघोरी तप साधना हे लोक करतात. जारण मारण, मंत्र तंत्र इ. सारख्या कर्मांनी ते लोकांना पीडा देतात. या तपांनी अशा अघोरी विद्या प्राप्त करून हे लोक इतरांना हानी पोहचवतात. माशी अन्नावर बसून स्वत: अन्न खाते पण दुसऱ्यांना भडाभडा ओकायला लावते. तामसी लोकांचे तप हे स्वत:ला पीडा देऊन इतरांनाही पीडादायक होते.

**तामस पूजा -** तामसी लोकंची पूजाही तशीच असते ते प्रेतांची व भूतांची पूजा करतात.

काही लोक स्मशानातल्या प्रेतांची, कबरट्यांची पूजा करतात. पण प्रेतांची पूजा म्हणजे 'जड शरीराची पूजा' हा अर्थ गीतेला अभिप्रेत आहे. म्हणजे रात्रंदिवस देहपूजेत (देहाला नटवण्या-सजवण्यात) मग्न असणे. आपण नीटनेटके रहावे पण नटण्यातच सारा वेळ वाया घालवू नये. गीता याला प्रेताची पूजाच समजते. गीता म्हणजे त्यापेक्षा मनाचे (आत्म्याचे) सौंदर्य वाढवण्याचा प्रयत्न करा.

काहीजण भूतांची पण पूजा करतात. (पूजा म्हणजे चिंतन मनन, ध्यानधारणा वगैरे) तामसी लोक ऊन, वारा, पाऊस, वृक्ष, पाषाण इ. भूतांची (पंचमहाभूते) पूजा करतात. ही भूते म्हणजे जडद्रव्ये उच्चमूल्य पायदळी तुडवून वाईट मार्गाने भ्रष्टाचाराने पैसा मिळवणे ही धनाची पूजा (धन मिळवण्याच्याच भजनी लागणे) म्हणजेच जडद्रव्याची भूताचीच पूजा होय. जडतेच्या पलिकडे ज्यांची दृष्टी पोचत नाही ते प्रेतांचे नि भूतांचेच पूजक नि उपासक असतात.

३) तामस यज्ञ - 'जडाची उपासना करणाऱ्यांचा यज्ञ ही त्याच दर्जाचा असतो. विधीशून्य, मंत्रहीन, अन्नदान न करता, श्रद्धाहीन, दक्षिणारहित असा केलेला यज्ञ हा तामस यज्ञ होय.

तामसी लोकांची आपल्या कर्मावर श्रद्धा नसते. सर्व कामे ते नाईलाज म्हणून, करायची म्हणून कशीतरी, कशीबशी उरकतात. काम त्यांना नकोच असते. स्वधर्मरुप यज्ञ ते दक्षिणाशून्य, मंत्रहीन, विधीशून्य अन्नदानाशिवाय करतात. आपले काम त अनिच्छेने लादले गेल्यासारखे पार पाडतात. कर्मात त्यांना मुळीच रस नसतो. श्रम हे तर प्रेमाचे मूर्त स्वरुप. स्वधर्माचरण करतांना विश्वप्रेमाचा मंत्र हा जपायला हवा. तरच तो श्रेष्ठ यज्ञ.

४) तामस दान - जे दान देश, काळ पात्रता यांचा विचार न करता आणि अवमानपूर्वक दिले जाते ते तामस दान होय. तामसी लोकांना दान द्यावेसेच वाटत नाही. दान द्यायला त्यांच्या जीवावर येते. कोणी एखादा मागेच लागला तर ते दान देताना घेणाऱ्याचा अपमान करून हे तामसी लोक दान देतात. आपला फायदा होईल अशाच ठिकाणी दान दिले जाते. म्हणजे प्राप्तीकर चुकवण्यासाठी दिलेले दान हे तामसीच म्हणायला हवे. सत्पात्री दान देण्याचा योग आला तरी ते त्यांच्या हातून सुटायचे नाही. रजोगुणी तमोगुणी लोक आसुरी संपत्तीने युक्त असतात. या दोन्हीचा त्याग करून सत्वगुणाचाच अंगीकार करावा, म्हणून श्रद्धा, यज्ञ, दान, तप याचे त्रिविध प्रकार सांगून भगवंत शेवटी

म्हणतात की शुद्ध सत्वगुणाने युक्त होऊन शास्त्रविहित कर्म केले तर उत्तम लोकाचे फळ जीवाला मिळेल पण त्यात आणखी एका गोष्टीची भर टाकली तर साक्षात मोक्षही प्राप्त होईल. एरवी स्वतंत्रपणे सात्त्विक कर्म सुद्धा मोक्षाला नेणार नाही. अशी वस्तू कोणती? हे जाणून घ्यायची अर्जुनाला फारच उत्कंठा लागली म्हणून भगवंत त्या वस्तूबद्दल सांगून तिचे महात्म्यही सांगतात.

'ॐ तत् सत्' हे साक्षात परब्रह्माचे नाव आहे ते घेऊन जर मानवाने सात्त्विक कर्मे केली तर मोक्षापर्यंत नेण्याचे सामर्थ्य कर्मात आणण्याची शक्ती या नावात आहे. वास्तविक निर्गुण निराकार अनादि ब्रह्माला ना कोठून असणार? पण श्रुती माऊलीला, संसार तापाने पीडलेल्या लोकाची दया आली व दुःखातून सुटका होऊन जीवाला ब्रह्मप्राप्ती करून देण्यासाठी हे नाव तिने ब्रह्माला ठेवले. असे ज्ञानोबामाऊली म्हणतात. या नामाच्या आवर्तनानेच खुद ब्रह्माच्या ठिकाणी सृष्टी उत्पन्न करण्याची शक्ती आली.

सात्त्विक कर्म या नामाच्या उच्चाराने सुरू केले तर मोक्ष त्याचा चाकर होऊन पुढे येतो. पण हे नाम कसे घ्यायचे हे मात्र कळले पाहिजे. नाहीतर ते सात्त्विक कर्म करून व नाम जपून उपयोग होणार नाही.

'ॐ तत् सत्' अशा तीन प्रकारे शास्त्रात परब्रह्माचा निर्देश केला जातो. याच निर्देशाने ब्राह्मण (ज्ञाता), वेद (ज्ञान), यज्ञ (कर्म) यांचे पूर्वी जन्म झाले. 'ॐ तत् सत्' या संकल्पानेच जगताचा प्रारंभ झाला आहे. ब्रह्मवादी लोकांची कर्मे म्हणून यज्ञ, दान, तप आणि शास्त्रोक्त कर्मे नेहमीच 'ॐ' असा उच्चार करनू आरंभिली जातात. 'तत्' शब्दाने फलाची आशा न धरता यज्ञ, दान, तप आणि अनेक प्रकारची इतर क्रिया कर्मे मोक्षार्थी लोक करतात. 'सत्' शब्दाने सत्ता, साधुभाव आणि प्रशस्त कर्मे हा अर्थ सूचित होतो. यज्ञ-दान-तप या ठिकाणी असणाऱ्या स्थिर भावनेलाही 'सद्' असे म्हणतात. म्हणून या तिन्हीसाठी जे कर्म करायचे त्या कर्माला 'सत्' म्हटले जाते.

ॐ हा गूढ नाद आहे. परब्रह्मात प्रथम ॐ हाच नाद उठला. हा नाद उठताच आदिसंकल्परुप ब्रह्मदेव हाच ब्राह्मण, वेद म्हणजे ज्ञान (अहंचे स्फूरण) व यज्ञ (बहुस्याय ही कामना ! ज्यामुळे 'अहं'ला स्वतःच स्वतःची (एकत्वाची) आहुती द्यावी लागून जगताचा प्रारंभ झाला) याचा जन्म झाला.

'ॐ' हे गूढ रहस्य आहे. ॐकारात अ, उ, म आणि नाद बिंदू (अनुस्वार) अशा साडेतीन मात्रा आहेत.

ॐकार म्हणजे सारे विश्व. अ, उ, म आणि नाद बिंदू.

'अ' - ही मात्रा स्थूल जगत सूचित करते. (जड साकार सृष्टी) अकार हे परमात्म्याचे चरण होत. (अकार चरण युगुले) येथे स्थिरता आहे.

'उ' - 'उ'कार म्हणजे सारे सूक्ष्म जगत. मन - बुद्धी अहंकाराचे सारे जगत हे सूक्ष्म जगत. ही सूक्ष्म सृष्टी पण खूप विशाल आहे. (उकार उदर विशाल)

'म' - 'म'कार म्हणजे सारे ज्ञान जगत. मकाराने सारी सृष्टी एका चैतन्य सुत्रात गुंफली आहे याचे ज्ञान होते. सृष्टीच्या विविधतेला, गुंफणारे आत्मतत्व अनुभवणे हेच ज्ञान : ते आनंदमय आहे. (मकार महामंडल मस्तकाकारे) म्हणूनच मस्तक.

'ँ' ही अर्धमात्रा म्हणजे नादबिंदू. ही प्रशान्त परब्रह्माची अवस्था होय.

सारे स्थूल जगत, सूक्ष्म जगत, ज्ञान जगत हे साऱ्यांना सुत्रात गुंफणारे व त्या पलिकडे असणारे प्रशान्त परब्रह्म, एकमेवाद्वितिय असे परमत्व. हे सारे मिळून ॐकार होतो. ॐकाराच्या सर्व मात्रांचा अभ्यास म्हणजे ब्रह्मापासून स्थूलापर्यंत सर्वांचे एकात्मतेने चिंतन मनन.

हेच ॐ (परब्रह्म) तत् (ते) सत् (आहेच) ही सारी

सृष्टी विविधतेने नटलेली असली तरी ती एकात्मच आहे. ॐकाराचा उच्चार करून ज्ञानी लोक यज्ञ दान तपादि कर्मांचा प्रारंभ करतात. 'सद्' हेच चैतन्य असल्याने त्या सद्भावाने स्थलकालात बद्ध झालेली कर्मेही 'प्रशस्त' म्हणजे व्यापक बनतात.

हे वध अर्जुना, अश्रद्धेने केलेले हवन, दिलेले दान, आचरलेले तप किंवा इतर कोणतेही कर्म 'असत्' म्हटले जाते. ते परलोकी उपयोगी पडत नाही व इहलोकीही उपयोगी पडत नाही. म्हणजेच ती कर्मे निष्फळ ठरतात. आपल्या जीवनकर्मांना परतत्वाचा स्पर्श होणे आवश्यक आहे तरच सहलोकी व परलोकी त्याचा लाभ होऊ शकतो अन्यथा अश्रद्धेने इह व परलोक तो गमावतो.

केव्हाही यज्ञ-दान-तप या व इतरही कर्मांना ईश्वराचे अधिष्ठान असणे उचितच. या जीवनकर्मांनी अखंड स्वरुपानंद भोगणे म्हणजेच मोक्ष. शास्त्रविधीने नियत केलेली नित्य कर्मे अत्यंत श्रद्धेने आणि सात्त्विक बुद्धीने करावीत हेच भगवंताच्या निरूपणाचे सार आहे. नवीन पिढीला (जी हॉटेलमधील चमचमीत खायला चटावलेली आहे) शरीर व मन शुद्ध राखण्यासाठी कोणता आहार असावा याचा विवेक करायला भगवंत आवर्जुन सांगत आहेत. यज्ञ-दान-तप हे सात्त्विक झाले की मग परमात्म्याचे दर्शन दुर्लभ नाही.

दैवी संपती अंगिकारून जर आहार सात्त्विक घेतला तर शरीर निरोगी, पवित्र, शुद्ध राहून यज्ञ (कर्म) उत्साहाने साध्य होईल. तो साधला तरच शुद्ध सात्त्विक तप आचरले जाईल व त्यामुळे निष्कामपणे सत्पात्री दान दिले जाईल. याप्रमाणे जर प्रत्येकजण आचरण करेल तर 'जो जे वांछिल तो ते लाहो' ही ज्ञानेश्वरांची वैश्विक इच्छा पूर्णत्वाला जाईल.

**आशा भिडे**

बी/१, विजय अपार्टमेंटस्, 'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२. फोन : २५४१०१४०

(पान क्र. १२ वरून)

## आणि तरीही मी !

व्यथित करून साकळलेल्या भावना, न मिळालेलं प्रेम, हरवलेलं बालपण, प्रत्येकाचं आपल्यापुरतचं जगणं, कासवासारखं दचकून राहणं, कणा मोडलेले चेहरे, समाजातील बकालपणा, भ्रष्टाचार अशा विविध विषयांच्या अंगांच्या छटा या काव्यसंग्रहातून दिसतात. पाऊस, समुद्राच्या गाजांचं पार्श्वसंगीत, ध्यानस्थ बगळे, तळ्यात थेंबाथेंबांनी हलणारं मोकळं आकाश अशा कल्पनांतून कवितेतील निसर्गाही जिवंत राहिला आहे. व्हिन्सेंट, थिओ, लॉर्काची - गुलजारांची कविता अशा कलावंतांचे आलेले संदर्भ पाहिले की कवीचा कवितेबद्दल असलेला डोळस दृष्टिकोन व अभ्यास दिसून येतो. काही अपवादात्मक कवितेतील बटबटीतपणा सोडला तर कवीची कवितेविषयी असणारी जागृकता, स्वत:च्या अनुभवातून कवितेकडे पाहण्याचा परिपक्व दृष्टिकोन दिसून येतो. काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ, कवितेची मांडणी 'श्री. अमोल पालेकरांनी' जीव ओतून केल्याची जाणवते आणि मुखपृष्ठावरून आतल्या कवितेंची झलक व्यक्त करण्यात ते यशस्वी झाल्याचे दिसते. माझ्या आजूबाजूला हे इतकं गलथन सुरू असून देखील यातही मी जगतो आहे, हा काव्यसंग्रहाचा सारांश 'आणि तरीही मी !' या तीनच शब्दात म्हणजेच शीर्षकाद्वारे अगदी समर्पकरीत्या व्यक्त करण्यात आला आहे. एकूणच वास्तवाला जिवंत करणारी कविता म्हणजे 'आणि तरीही मी !'....

**- गीतेश गजानन शिंदे**

२०३, स्वप्नजा सोसायटी,
धोबी आळी, मावळी मंडळ हॉल जवळ,
टेंभी नाका, ठाणे (प.) - ४०० ६०१.
दूरध्वनी : २५३७ १५१९


# ऑर्किडस् - एक कुतुहल

*वनस्पतीविश्वात ठाइागणिक अनेक कुतुहले बघणारास दिसू शकतात. ऑर्किडस् हे असेच एक कुतुहल डॉ. मुळगावकर मॅडम यांनी या विषयात* Ph. D. *चे संशोधन केले आहे. - संपादक*

Atwood ह्या वनस्पतिशास्त्रज्ञांच्या मते जगातील एकूण ऑर्किडस्ची संख्या, ११२१८ इतकी आहे. संपूर्ण भारतभर जवळजवळ २००० प्रकाराची ऑर्किडस् आढळतात. मुंबईनजिकच्या परिसरात एकूण ११७ प्रकारच्या जाती उपलब्ध आहेत. यशिवाय २०,००० हायब्रीडच्या जातींची लागवडही केली जाते. Piji आणि Dodson ह्या शास्त्रज्ञांच्या मते जगातील एकूण फुलझाडांपैकी ७% फूलझाडे ऑर्किडस्ची आहेत.

या वनस्पतींचा अभ्यास, महाराष्ट्रात प्रथम Birdwood या शास्त्रज्ञाने केला. त्यानंतर अधिकाधिक माहिती आपल्याला Gammie, Cooke, Blatter and McCann तसेच Santapau, Kapadia या शास्त्रज्ञांनी करून दिली आहे. फादर Santapau यांनी मुंबईमध्ये उपलब्ध असणाऱ्या ऑर्किडस्चा सखोल अभ्यास केला आहे.

ऑर्किड ही अनेक ठिकाणी उगवणारी वनस्पती आहे म्हणजे जमिनीवर उगवणारी. यांना Terristrialअसे म्हणतात. उदा. Eulophia, Habenaria, Arundina इ. काहींना Epiphytes असे म्हटले जाते. ह्या प्रकारची ऑर्किडस् बहुधा कुठल्या तरी उंच झाडाच्या फांद्यावर आढळतात. ही ऑर्किडस् त्या झाडाचा उपयोग फक्त आधारासाठीच करतात. पोषणाच्या दृष्टीने ती त्या झाडावर अवलंबून नसतात. त्यामुळे ती कुठल्याही प्रकारे त्या झाडाला इजा पोहोचवत नाहीत. उदा.Aerides, Cymbidium, Dendrobium. काही ऑर्किडस्ना Lithophytes म्हणतात. या साधारणपणे दगडावर उगवलेल्या दिसतात. तर काही Saprophytes म्हणजे कुजलेल्या पाल्या-पाचोळ्यावर उगवलेली दिसतात. उदा. Gastrodia, Malaxis वगैरे तर काही Climbers किंवा वेली. उदा. <u>Galeola nudiflora</u> किंवा <u>Vanilla planifolia.</u>



ऑर्किडस्ची फुलं ही अतिशय मोहक, आकर्षक, विविध आकारांची व रंगांची असतात. त्यांचे रंग खूपच आकर्षक असतात. काही फूलांना एक विशिष्ट सुगंध असतो. फुलांचे विविध रंग प्रामुख्याने क्लोरोफिल, अँनथोसायनीन व कॅरोटिनॉइडस् ह्या रंगद्रव्यांच्या प्रमाणावर अवलंबून असत.

ऑर्किडस्च्या फुलांना जागतिक बाजारपेठेत प्रचंड मागणी आहे. काही देशांमध्ये या फुलांना राष्ट्रीय फुलांचा दर्जा सुद्धा देण्यात आला आहे. श्रीलंकेत Dendrobium marcarthiae, कोलंबियात <u>Cattleya trianaei</u>, कोस्टारीकामध्ये <u>Cattleya skimeri</u>, पनामामध्ये <u>Peristeria elata</u> ह्या ऑर्किडस्च्या फुलांना

राष्ट्रीय फुलांचा दर्जा देण्यात आला आहे.

ऑर्किडस्‌ची फुलं निसर्गातील अनेक गोष्टींचं बारीक निरीक्षण करून त्यांची हुबेहुब नक्कल करताना दिसतात. Ophrys apifera ह्या ऑर्किडस्‌ची फुलं अगदी Bee किंवा मधमाशी सारखी म्हणून ह्याला 'बी-ऑर्किड' म्हणतात. Coeloglossum virdi ह्या ऑर्किडची फुलं सूक्ष्म बेडकासारखी दिसतात म्हणून हे Minute frog orchid. Peristeria elota. ह्या फुलाचा मधला भाग कबुतराच्या आकाराचा म्हणून हे Dove-orchid, Bulbophyllum purpure-orhachis, सरड्याची नक्कल करतो म्हणून Lizard orchid, Odontoglossum grande, ह्या फुलांचा रंग व अंगावरचे पट्टे वाघासारखे म्हणून Tiger Orchids, Pholidota articulata, ह्याच्या कळ्यांचा समुदाय खडखड आवाज करतो म्हणून Rattle Snake Orchid या नावाने प्रसिद्ध आहे. Dendrobium pulchellum ची फुलं कुत्र्याच्या तोंडासारखी दिसतात. हे ऑर्किड 'डॉग आर्किड' म्हणून ओळखले जातात.

Aerides आणि Rhynchostylis ह्या ऑर्किडस्‌ना 'फॉक्स-टेल ऑर्किडस्' म्हणतात. कारण ह्या फुलांचे तुरे लांब-लचक, भरगच्च आणि कोल्ह्याच्या शेपटीसारखे दिसतात. ओबेरोनियाच्या फुलांचे तुरे उंदराच्या शेपटीच्या आकाराचे असतात म्हणून त्याला 'रॅट-टेल ऑर्किड' म्हणतात.

ही फुलं नुसतीच प्राण्यांचीच नक्कल करून थांबलेली नाहीत तर ती माणसांचीही नक्कल करताना दिसतात. उदा. Oncidiumच्या फुलांना dancing dalls किंवा नाचणाऱ्या बाहुल्या म्हणतात. Cyperipedium himalaicum हुबेहुब स्त्रियांच्या पायातील वहाणेप्रमाणे दिसतात म्हणून त्यांना 'Lady Slipper Orchid' म्हणतात. या ऑर्किड बद्दल अशी आख्यायिका आहे की Venus या देवतेची वहाण, वादळात सापडल्यामुळे हरवली. जेव्हा देवदूताने ह्या वहाणेला स्पर्श केला तेव्हा त्याचे रुपांतर एका सुंदर फुलात झाले म्हणूनच हे 'Venus's shoe' किंवा 'Lady Slipper Orchid' होय. 'Spiranthes' हे 'Lady's tresses orchid' म्हणून ओळखले जात कारण ह्या फुलांचे तुरे स्त्रियांच्या गुंफलेल्या वेणीप्रमाणे दिसतात.

नुसत्या उंचीचा विचार केला तर Grammatophyllum multiflorum हे सर्वात उंच ऑर्किड समजलं जात आणि ह्याची फुलं सर्वात जास्त म्हणजे २७० दिवस टिकतात. Bulbophyllum minutissimum हे सर्वात छोटं किंवा बुटकं ऑर्किड आहे. Cattleyaची फुलं ही सर्वात मोठी फुलं समजली जातात.

ऑर्किडच्या फुलांना सर्व सामान्यपणे सहा पाकळ्या असतात, त्यामधली एक पाकळी ही सगळ्यात वेगळी म्हणून तिला लॅबेलम असे म्हणतात. ह्या फुलाचं आणखी एक वैशिष्ट हे की त्यामधील परागकण, पॉलिनियाच्या स्वरूपात असतात. पॉलिनियामध्ये ऑक्झिनसचं प्रमाण खूप म्हणजे १०० ग्रॅम पॉलिनीयामधून १०० मिलीग्रॅम एवढं ऑक्झीन मिळतं.

Ceratostylis rubra ह्या ऑर्किडला 'At last' हा किताब मिळाला. १९९० सालच पारितोषिकही ह्यानेच पटकावलं. या ऑर्किडला जास्तीत जास्त म्हणजे एकूण ४२५ फुलांचे तुरे आणि ३००० फुलं आली.

ऑर्किडस्‌च्या हायब्रीड जातींची फुलं जवळजवळ ८-१२ आठवडे टिकतात. त्यामुळे परदेशात ह्या फुलांनी गुलाब, शेवंती, ग्लॅडिओलस ह्या फुलांचं महत्त्व बऱ्याच प्रमाणात कमी केलं आहे. त्यामुळे आज तिथे पुष्पगुच्छांध्ये,

पुष्परचनांमध्ये प्रामुख्याने ऑर्किडच्याच फुलांचा वापर होतो.

थायलंड, सिंगापूर, मलेशिया व हवाई हे देश ऑर्किडच्या फुलांच्या निर्यातीत अग्रेसर आहेत. जपान, जर्मनी, इटली, फ्रांस व अमेरिकेत ही फुलं मोठ्या प्रमाणात वापरली जातात. सिंबीडीयम, पॅफीओपेडिलम ही जास्त प्रमाणात हॉलंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणिफ्रान्समध्ये आढळतात. डेंड्रोबियम ही मोठ्या प्रमाणावर थाइलंड इथे वाढतात व तिथून निर्यात केली जातात. अरांडा, अरांनतेरा, डेंड्रोबियम, हॉलटुमारा, मोकारा, ऑनसिडियम आणि रेनानटानंडा ही सिंगापूर इथून निर्यात केली जातात. मलेशिया, डेंड्रोबियम, ऑनसिडीयम, अरांडा व मोकारा ह्यासाठी प्रसिद्ध आहे. तैवानमधून कॅटलिया, सिंबिडियम, डेंड्रोबियम, फेलिनॉपसीस आणि वॅंडा (Vanda) निर्यात केली जातात. U.S.A. मधून कॅटलिया, पॅफिओपेडिलम व सींबिडियम निर्यात केली जातात तर पोर्तुगालमधून पॅफिओपेडिलम व सिंबिडयम याची निर्यात होते.

भारतामध्ये जवळजवळ २००० प्रकारची ऑर्किडस् मिळतात. भारतातील सिक्कीम सिंबिडियमसाठी प्रसिद्ध आहे. सिक्कीम खालोखाल केरळ हे राज्य ऑर्किडस्च्या पैदाशीबद्दल प्रसिद्ध आहे.

बंगलोरमधील इंडो-अमेरिकन हायब्रीड सीडस, कोचीन येथील ए.व्ही. थॉमस ग्रुप, हैद्राबादचे हिंदुस्थान ॲग्रोजेनेटिकस् आणि मुंबई येथील डे ऑर्किडस् (दिलीप डे व शोभा डे) यांचे आणि बऱ्याच अशा कंपन्या आर्किडस्ची पैदास वाढविण्याच्या दृष्टीने लोकांना मदत करीत आहेत.

जोसेफ-अरडिटी ह्या शास्त्रज्ञाने १९८९ सालच्या अमेरिकन ऑर्किड सोसायटी बुलेटिनमध्ये आपलं असं निरिक्षण मांडलं होतं की जे लोक ऑर्किडस्च्या सान्निध्यात रहातात त्याचं सरासरी आयुष्यमान हे इतर लोकांपेक्षा जास्त असतं. ह्या म्हणण्याला दोन बाजू असू शकतात. एकतर ज्या लोकांच आयुष्यच जास्त असतं, त्यांनाच ऑर्किडस् मोहून टाकतात किंवा ऑर्किडस्मध्ये अशी काही रासायनिक द्रव्ये असावीत की त्यांचा परिणाम त्यांच्या सान्निध्यात येणाऱ्या लोकांवर होऊन त्यांचं आयुष्यमान वाढतं.

आज ऑर्किडस्ची पहाणी केली असता असं आढळून येतं की त्यांची संख्या दिवसेंदिवस घटत चालली आहे. जवळ-जवळ १३-१५ जातींची ऑर्किडस् आज नष्ट झालेली दिसतायत.

आकर्षक फुलं आणि औषधी गुणधर्म यामुळे मोठ्या प्रमाणावर ऑर्किडस् तोडली जातायत. झपाट्याने बदलणारी सभोवतालची परिस्थिती, पर्यावरणातील बदल, प्रदुषण, शहरीकरण, कारखान्यांच्या संख्येत होत असलेली वाढ आणि रस्ता-रुंदीकरणासाठी झालेली वृक्ष-तोड ही ह्याची कारण असू शकतात.

**प्रा. डॉ. मेधा मुळगावकर**
वनस्पतिविभाग प्रमुख,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय,
ठाणे.

•••

दिशा
नियमित
वाचा

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# अब्राहम मास्ली आणि संप्रेरण सिद्धान्त

*मानवी गरजांच्या उतरंडीचा सिद्धान्त हा मानसशास्त्रातील एक महत्त्वाचा ठरलेला विषय. या सिद्धान्ताचे हे सोप्या भाषेतील विवेचन. - संपादक*

'प्रयोजनम् अनुदिश्य मूढोऽपि न प्रवर्तते' असं संस्कृत वचन आहे. प्रयोजन किंवा हेतू नसला तर मूर्ख व्यक्तीही कामासाठी प्रवृत्त होत नाही. हाच प्रयोजनांचा आणि मानवी संप्रेरणाचा (motivation) सिद्धान्त अब्राहम मास्लो (१९०८-१९७०) याने पाश्चात्त्य देशात स्पष्टपणे मांडला. साध्या, सोप्या मांडणीमुळे हा 'मानवी गरजांच्या उतरंडीचा सिद्धान्त' म्हणून जगभर प्रसिद्ध आला.

अब्राहम मास्लोचा जन्म १ एप्रिल १९०८ रोजी न्यूयॉर्कमधील ब्रुकलिन येथे झाला. लहानपणी अब्राहम बुजरा, संकोची आणि एकलकोंडा होता. पुस्तकांशी आणि ग्रंथालयाशी त्याची मैत्री होती. त्याचे पालक रशियातून स्थलांतरित झालेले अशिक्षित, ज्यू निर्वासित होते. शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी अब्राहमला शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले. आई-वडिलांच्या इच्छेनुसार मास्लोने प्रथम न्यूयॉर्कच्या सिटी कॉलेजमधून कायद्याचे शिक्षण घेतले. त्यानंतर तो उत्तर अमेरिकेत विस्कोन्सिन येथे स्थलांतरित झाला. १९३० मध्ये मानसशास्त्र विषयात त्याने बी.ए. ची पदवी मिळविली. १९३१ मध्ये त्याने मानसशास्त्रात एम्. ए. केले व १९३४ मध्ये त्याला डॉक्टरेट मिळाली. ब्रुकलिन कॉलेजमध्ये तो मानसशास्त्र शिकवू लागला. १९५१ साली कॉलेजची नोकरी सोडून ब्रँडिस युनिवर्सिटीत तो मानसशास्त्राचा प्राध्यापक झाला. आपला संप्रेरणाचा सिद्धान्त मांडण्यापूर्वी त्याने माकडांवर प्रयोग केले. हा सिद्धान्त गरजांवर आधारित होता. या सिद्धान्ताने मास्लोला जगभर नाव आणि प्रतिष्ठा मिळवून दिली.

या सिद्धान्तामागे दोन महत्त्वाची गृहीतके होती. ती अशी -

(१) गरजा या मानवी अस्तित्वाला आवश्यक आहेत. अतृप्त गरजा माणसाला कामासाठी प्रवृत्त करतात.

(२) गरजांमध्ये मूलभूत- लौकिक-अस्मिताप्रेरक असे निम्न-मध्यम-उच्च या प्रकारचे अनेक स्तर असतात. गरजांची शिडी कल्पिली तर मूलभूत पातळीवरील गरजांची पूर्ती झाल्याशिवाय पुढील स्तरावरच्या गरजा जाणवत नाहीत.

मास्लोने या गरजांचे पाच स्तर मांडले. प्राथमिक स्तरावर भौतिक आणि शारीरिक गरजा ठेवल्या. यात अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा अन्तर्भूत आहेत. यातही विशिष्ट गरजांना प्राधान्य मिळेल. उदाहरणार्थ, भूक आणि तहान या दोन गरजांमध्ये तहान ही गरज अधिक निकडीची आहे. भूक भागविल्याशिवाय माणूस काही आठवडे जगू शकतो, पण तहान भागविल्याशिवाय आठवडाभर राहणे अशक्य आहे. म्हणजे तहान ही भुकेपेक्षा अधिक महत्त्वाची आहे. त्यानंतर भूक, आसरा अशा एका स्तरावरही गरजांच्या श्रेणी भिन्न असतात.

भौतिक गरजांच्या वरच्या पातळीवर सुरक्षिततेच्या गरजा आहेत. शारीरिक गरजा भागल्या तरच या पातळीवर येऊन, सुरक्षित वातावरणासाठी माणूस कार्यप्रवण होतो. नोकरीधंद्याची शाश्वती, स्थैर्य, घरी व नोकरीच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण, चांगला शेजार, विमा, निवृत्तीची आखणी या गोष्टींचा समावेश या स्तरावरील गरजांमध्ये होतो. सुरक्षित वातावरणाची गरज लहान मुलांना प्रकर्षाने जाणवते तर मोठ्यांना युद्धकाळात, आणीबाणीत फार प्रभावीपणे जाणवते.

मास्लोने तिसऱ्या स्तरावर सामाजिक गरजा

ठेवल्या. यात लग्न, कुटुंबाची गरज, सामाजिक गटाचे वा समूहाचे सभासदत्व, पती वा पत्नी, मित्र-मैत्रिणी, सखे-सोबती वा सर्वांकडून मिळणारे प्रेम, माया, आपुलकी, स्नेह या सर्वांचा अंतर्भाव होतो. सामाजिक स्वीकृती हा या स्तरावरील गरजांचा गाभा आहे.

सामाजिक स्वीकृतीनंतर मनुष्याला समाजात कीर्ती, मानमरातब, प्रतिष्ठा, सत्ता या गोष्टींची गरज जाणवू लागते. समाजात आपले विशिष्ट स्थान असावे, मान-सन्मान, पारितोषिके यासाठी आपण प्रयत्न करावे, असे त्याला वाटू लागते. म्हणजेच त्याची अस्मिता जागृत होते. या अस्मिताप्रेरक गरजा दोन प्रकारच्या आहेत.

१) व्यक्तीची स्वतःच्या मनातली प्रतिमा किंवा त्याचा आत्मसन्मान. माणसाचा 'अहं' एखाद्या विषयातील कौशल्यामुळे सुखावतो. मग तो आपले कौशल्य पणाला लावतो.

२) दुसऱ्यांकडून, समाजाकडून मिळालेली मान्यता. आपल्या कामामुळे दुसऱ्यांकडून मिळालेली स्वीकृती अधिक काम करण्यास प्रेरक ठरते. विद्यार्थ्यांच्या पाठीवरची शिक्षकांची शाबासकीची थाप त्यांना अधिक अभ्यासाला प्रवृत्त करते.

गरजांचा पाचवा स्तर हा परिपूर्णतेच्या ध्यासातून निर्माण होणारा आहे. या गरजांना मास्लोने 'वाढीच्या संप्रेरक गरजा' असे संबोधिले आहे. या स्तरावर माणूस आपले सत्व पणाला लावतो. तो आपल्या ध्येयसिद्धीची वाट चालत असतो. या स्तरावरील माणसांची ध्येये असामान्य असतात.

या ध्येयसिद्धीचे टोक गाठणाऱ्या स्तरावरील गरजांचा विचार हा मास्लोच्या संप्रेरण सिद्धान्ताचा कलशाध्याय आहे. या गरजांचा अभ्यास करण्यासाठी मास्लोने काही 'असामान्य' व्यक्तींच्या आयुष्याचा विचार केला. यात महात्मा गांधी, अब्राहम लिंकन, अल्बर्ट आईन्स्टाइन, थॉमस जेफरसन इत्यादी व्यक्तींच्या जगण्याच्या पद्धती, त्यांच्या निष्ठा व त्यांच्यातील अलौकिक गुणांचे निरीक्षण केले. त्यातून या व्यक्तींमध्ये आढळलेले व्यक्तिमत्त्वाचे सर्वसाधारण पैलू असे

१) या व्यक्ती अत्यंत साध्या आणि उत्स्फूर्त होत्या.

२) त्या वास्तववादी होत्या.

३) त्यांची 'साध्य' आणि 'साधने' याविषयीची समज असामान्य होती.

४) या व्यक्ती लोकशाहीची मूल्ये मानणाऱ्या होत्या.

५) त्या सामाजिक दबावाला बळी पडत नव्हत्या.

६) त्यांच्यात असाधारण विनोदबुद्धी, खिलाडू वृत्ती व स्वावलंबन या गोष्टी आढळल्या.

७) या व्यक्ती सभोवतालचे वातावरण घडवत होत्या.

या व्यक्तींचे अनुभव टोकाचे होते. मास्लोच्या मते असे भव्य अनुभव माणसाला दिव्यत्वाची प्रचीती आणतात. ही माणसे समृद्ध व्यक्तित्वाची असली तरी परिपूर्ण असतात असे नाही. त्यांच्यातही तीव्र चिंता किंवा अपराधीपणाची भावना वसत असते. परंतु ती 'सच्ची' असते. त्यांच्या गरजा आयुष्यातील सत्य, शिव आणि सुंदर या त्रयीशी निगडित असतात. या गरजा पूर्ण झाल्या नाहीत तर या व्यक्तीही वैफल्यग्रस्त होऊ शकतील!

मास्लोच्या सिद्धान्तातील गरजांची मांडणी पुढील आकृतीद्वारा दाखविता येईल -

पहिल्या चार स्तरांवरील गरजांना मास्लो नकारात्मक गरजा (deficit needs) मानतो. या



स्तरांवरील आवश्यक गोष्टी त्या त्या वेळी जोपर्यंत तुम्हाला मिळत नाहीत, तोपर्यंतच तुम्हाला त्यांची उणीव भासते. त्या गरजा कार्यप्रेरक ठरतात. त्या गरजा पूर्ण झाल्यानंतर मात्र त्यांचे संप्रेषण राहत नाही. माणसाचा प्रवास पुढील स्तरावरच्या गरजांच्या दिशेने चालू होतो. लहानपणी शारीरिक गरजा अधिक प्रखर असतात. त्यानंतर इतर गरजा जाणवू लागतात. संकटात या गरजा प्रखर होतात. उदाहरणार्थ - युद्धकाळात जशा सुरक्षिततेच्या गरजा तीव्र होतात, तशाच दुष्काळी भागात अन्न-पाण्याच्या गरजा तोंड वर काढतात.

लहानपणी या उतरंडीतील एखादी मूलभूत गरज व्यवस्थित रीतीने भागली नाही तर आयुष्यभर ती आपल्या आयुष्याला व्यापण्याची शक्यता असते. उदाहरणार्थ, लढाईच्या काळात एखाद्याचे बालपण गेले असेल, तर पुढेही तो माणूस सतत संकटकाळासाठी पुरेसा पैसा, खाणे-पिणे, इतर साहित्य सतत जवळ बाळगेल. मास्लोच्या मते मूलभूत गरजांचा आयुष्यातील 'मूल्यां'शी सुतराम् संबंध नसतो.

गरजांचा परिपूर्णतेचा, संकल्पसिद्धीचा कळस मात्र वेगळा आहे. या गरजा मूल्यांशी निगडित असून माणसाच्या व्यक्तिमत्वाचा तोल सांभाळतात. त्या भागवल्या गेल्यास व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व अधिकाधिक समृद्ध होते. या भागवल्या तरी सतत प्रखरतेने जाणवत राहतात. समाधानही देत राहतात. मास्लोचा गरजांच्या उतरंडीचा सिद्धान्त हा असा मूलभूत गरजांकडून परिपूर्तीच्या गरजांपर्यंतचा प्रवास समजून घेणारा आहे. माणसाची काम करण्याची प्रेरणा ही या वेगवेगळ्या स्तरांमधून उद्भवत असते हे मास्लोने ठामपणे मांडले.

हा सिद्धान्त साधा, सरळ, सोपा वाटला तरी त्यावर अनेक मानसशास्त्रज्ञांनी टीकेची झोड उठविली. या सिद्धान्तांवर घेतले गेलेले महत्त्वाचे आक्षेप असे -

१) मुलभूत गरजांची पूर्ती झाल्याशिवाय सामाजिक गरजांच्या स्तरावर येणे शक्य नाही असे या सिद्धान्तानुसार मांडले गेले आहे. कित्येक नामवंत प्रतिभावंत अत्यंत दारिद्र्यातील आपले कार्य करून दाखवू शकले आहेत. म्हणजेच मूलभूत गरजांची पूर्ती न होताही ते गरजांच्या तिसऱ्या स्तरावर येऊ शकतात.

२) एकाचवेळी अनेक स्तरांवरील गरजा कार्यरत असणे शक्य आहे हे या सिद्धान्तात लक्षात घेतलेले नाही.

३) परिपूर्णतेच्या स्तरावर केवळ मोजक्या असामान्य यशस्वी माणसांच्या आयुष्याचा विचार करून सिद्धान्त मांडणे योग्य नाही.

परिपूर्णतेच्या गरजांचा विचार, तसेच गरजांचा एकत्रितपणे विचार या मास्लोच्या सिद्धान्ताने दिलेल्या दोन वेगळ्या गोष्टी होत्या. १९५४ साली मास्लोने आपले 'Motivation and Personality' हे बहुचर्चित पुस्तक लिहिले. त्यानंतरही त्याने विविध नियतकालिकांतून मानसशास्त्रविषयक लिखाण केले. 'Journal of Humanistic Psychology' या नियतकालिकाच्या स्थापनेत पुढाकार घेतला. Humanistic Psychology Association ची स्थापना केली. 'Toward Psychology of Being (1962), Further reaches of human nature (1961) यासारखी पुस्तके लिहिली.

८ जून १९७० रोजी मास्लोचे हृदयविकारामुळे निधन झाले. मास्लोचा मानवी गरजांचा सिद्धान्त अजरामर झाला.

---

संदर्भ : अब्राहम मास्लो (२०००) अहमदाबाद, टॉप.
डोनेली, जेम्स व इतर (१९९८)
फंडामेंटल्स ऑफ मॅनेजमेंट बोस्टन, आयर्विन मॅग्रोहिल.

---

- सुषमा पौडवाल
१२ ब, शततारका, आर.टी.ओ. समोर,
चार बंगला, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५३.
ई-मेल : sushama_juhu@redi(fmail.com

# श्रेष्ठ उर्दु कथाकार : सआदत हसन मंटो

*उर्दु साहित्यातील अनेक साहित्यकारांचा सखोल अभ्यास करणारे अनेक साहित्य रसिक आहेत. आमचे मित्र प्रा. भोंजाळ सर यांचा मंटोच्या कथांचा अभ्यास लक्षात घेऊन सदर लेख त्यांनी लिहावा अशी विनंती आम्ही त्यांना केली.*

*- संपादक*

प्रत्येक काळात 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' हा कळीचा मुद्दा ठरलेला आहे. अगदी अलीकडच्या काळात 'मी नथूराम गोडसे बोलतोय' या नाटकाच्या संदर्भात हा मुद्दा चर्चेला आलेला होता. 'यदाकदाचित' सारख्या नाटकावरही बंदी आणावी अशी काही संघटना मधून मधून मागणी करीत असतात. तर 'माझे पती छत्रपती' या नाटकाच्या नावातील 'छत्रपती' या शब्दाबद्दल आक्षेप घेऊन ते नाटक बंद पाडण्याचा प्रकारही झाला होता. मग त्या नाटकाच्या नावात बदल करून 'छत्रपती' च्या ऐवजी 'छत्रपिती' असे नाव करण्यात आले तर वसंत सावंत यांच्या 'गांधी' या कवितेवर आजही न्यायालयात खटला चालू आहे.

अशाप्रकारे प्रत्येक काळामध्ये कोणत्या न् कोणत्या कारणाने साहित्यावर बंदी घालावी की घालू नये हा मुद्दा चर्चेला येतो. कधी अश्लीलतेच्या कारणावरून, कधी कुणाच्या धार्मिक भावना दुखावल्या म्हणून तर कधी देशद्रोहाच्या आरोपावरून एखाद्या साहित्य कर्त्यावर बंदी आणली जाते. अशा वेळी कुणाला ना कुणाला त्याविरूद्ध लढा द्यावा लागतो.

५० वर्षांपूर्वी उर्दूतील श्रेष्ठ कथाकार सआदत हसन मंटो यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मुद्यावरून अनेक वेळा लढा द्यावा लागला. मंटोच्या कथांवर अश्लीलतेच्या आरोपाखाली खटले भरले गेले. मंटोच्या नावाला अश्लीलतेचं लेबल असं चिकटलं की, अश्लीलतेला मंटो हा जणू पर्यायवाची शब्द आहे, असा गैरसमज लोकांनी करून घेतला. हिंदी बुकस्टॉलवर मिळणाऱ्या 'मंटो की बदनाम कहानियाँ' वगैरे सारख्या पुस्तकांनीही वाचकांची दिशाभूल केली. त्यामुळे मंटोच्या साहित्याबद्दल गैरसमज फार पसरले. ते दूर व्हावेत म्हणून मंटोच्या कथा वाचकांनी मुळातून वाचायला हव्यात.

माझ्या वाचनात त्या कथा २० वर्षांपूर्वी आल्या आणि मी थरारून गेलो. त्या कथा आजच्या काळातही अश्लील तर नाहीतच पण त्यातील करुणेमुळे त्या जागतिक वाङ्‌मयात सहज जाऊन बसतील अशा दर्जाच्या आहेत हे मला जाणवलं. मग मी मंटोच्या कथांवरील खटल्यांचा शोध घ्यायला सुरुवात केली. त्यातूनच माझे 'मंटो हाजिर हो' हे पुस्तक सिद्ध झालेले आहे. त्यामध्ये मंटोच्या ज्या कथांवर खटले झाले त्या कथा आणि त्या कथांवरील खटल्यांसंबंधीची हकिकत दिलेली आहे. त्या खटल्यांमध्ये मंटोने कथाकार म्हणून आपली बाजू फार प्रभावीपणे मांडलेली आहे.

मंटोच्या कथा खरोखरच अश्लील होत्या का? कायदा करून किंवा धाक-दडपशाही करून साहित्यातील अश्लीलता दूर करता येईल का? या प्रश्नांची चर्चा माझ्या त्या पुस्तकांमुळे पुन्हा सुरू झाली तर ती साहित्याला उपकारकच ठरेल असा मला विश्वास वाटतो.

मंटोचा जन्म पूर्व पंजाबमधील समराल इथे ११ मे १९१२ रोजी झाला. त्याचे मॅट्रिकनंतरचे शिक्षण अमृतसर इथे झालं. परंतु पुस्तकी शिक्षणाकडे मंटोचं मुळीच लक्ष नव्हतं. त्यामुळे शिक्षणात त्यांची फारशी प्रगती झाली नाही. आपल्या आत्मपरिचयात्मक लेखात मंटोनी लिहिलंय की, 'माझं मन पुस्तकी शिक्षणात कधीच रमलं नाही. मी

मॅट्रिकला तीन वेळा नापास झालो. चौथ्या वेळी कसाबसा पास होऊन मी कॉलेजात दाखल झालो. तिथे मी जास्तच उडाणटप्पूपणा केला. त्यामुळे प्रवेश परीक्षा पास व्हायला मला तीन वर्षं लागली....

पण शिक्षणात रुची नसलेल्या मंटो यांनी जगाच्या खुल्या विद्यापीठात मात्र खूप ज्ञान मिळवलं. आपल्या विद्यार्थीदशेत त्यांनी गॉर्की, पुश्किन, ऑस्कर वाइल्ड आणि मोपासा यांचे ग्रंथ आवडीने वाचले. गॉर्कीच्या काही कथांचाही मंटोने उर्दूत अनुवाद केला आहे.

१९४० ते १९४३ या कालावधीत त्यांनी दिल्ली आकाशवाणी केंद्रात नभोनाट्य लिहिण्याचं काम केलं. १९४३ मध्ये ते दिल्लीहून मुंबईला आले आणि त्यांनी फिल्मिस्तान आणि बॉम्बे टॉकीजकरता पटकथा आणि संवाद लिहिले. 'अपनी नगरिया' 'मिर्जा गालिब', 'आठ दिन', 'मुसाफिर' वगैरे अनेक चित्रपटांसाठी त्यांनी लेखन केले. त्याच काळातील उर्दूतील कृष्णचंद्र, रामानंद सागर, बेदी, अब्बास यासारखे श्रेष्ठ कथालेखक मंटो यांच्या बरोबरीने चित्रपटसृष्टीतच होते. इतरांनी या मोहमयी दुनियेत आल्यानंतर फार चांगल्या कथा लिहिल्या असं दिसत नाही. पण मंटो यांनी मात्र मुंबईच्या वास्तव्यात अनेक चांगल्या कथा लिहिल्या. त्यांच्या बरोबरीने त्या काळातील नर्गिस, अशोक कुमार, कुलदीप कौर, व्ही.एच.देसाई, श्याम, नसीम, सितारा वगैरे स्त्री-पुरुषांच बहारदार शब्दचित्रं मंटोंनी रेखाटली. त्यांनी एकांकिकाही लिहिल्या.

पण प्रामुख्याने मंटो हे लघुकथाकारच होते. मुंबईमध्ये असताना त्यांनी जे बकाल आयुष्य उपभोगलं त्याचा परिणाम त्यांच्या लेखनावर झालेला दिसतो. त्यांनी वेश्यांच्या जीवनाचं सूक्ष्म निरीक्षण करून त्यांचं मनोविश्लेषण करणाऱ्या अनेक कथा लिहिल्या. त्यातील त्यांची अत्यंत गाजलेली कथा म्हणजे 'काली सलवार'.

या कथेवर अश्लीलतेच्या कारणाने खटला भरला गेला. ही कथा लाहोरमधून प्रकाशित होणाऱ्या 'अदब-ए-लतिफ' या पत्रिकेच्या वार्षिक अंकात १९४२ मध्ये प्रकाशित झाली. अश्लीलतेच्या कारणासाठी खालच्या कोर्टाने मंटोंना दंड ठोठावला. पण सेशन कोर्टाने त्यांना अश्लीलतेच्या आरोपातून मुक्त केलं. नंतर मंटोचा 'धुआँ' हा कथासंग्रह प्रकाशित झाला. त्या कथा संग्रहावरही खटला दाखल करण्यात आला. त्या खटल्यात पुन्हा 'काली सलवार' गोवली गेली. पण त्यावेळी ती कथा अश्लीलतेच्या आरोपातून मुक्त झाली. मंटोंनी या कथेविषयी 'लज्जतेसंग' मध्ये लिहितांना म्हटलं आहे की, 'मी कथेमध्ये कुठेही स्त्रीपुरुषातील शारीरिक संबंधाविषयी चवीने लिहिलेलं नाही. जी आपल्या गोऱ्या ग्राहकांना आपल्या भाषेत शिव्या देते किंवा त्यांना वेडपट समजते त्या सुलतानाकडून कोणत्याही प्रकारच्या आनंदाची अपेक्षा ठेवता येईल का? ती एक दुकानदार होती. अस्सल दुकानदार.'

मंटोच्या कथांनी खळबळ माजत होती. त्यावर खटले दाखल केले जात होते. तरीही मंटो निष्ठापूर्वक त्यांना जे अनुभवायला मिळालं ते कथेतून सांगण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांच्या कथेतील अस्सल कलात्मकतेबद्दल मात्र समीक्षकांचं दुमत नव्हतं.

फाळणीचाही त्यांच्या लिखाणावर परिणाम झाला. 'खोल दो', 'ठंडा गोस्त', 'टोबा टेकसिंह' या कथांतून त्यांनी फाळणीची भयानकता वाचकांसमोर मांडण्यात यश मिळवलं. या कथांमधून ज्या फाळणीने लाखो लोकांचे बळी घेतले आणि द्वेषाचा वारसा मागे ठेवला, त्या फाळणीच्या भयंकर शोकांतिकेचे वर्णन करण्यात मंटो अत्यंत यशस्वी झाले होते.

मंटोची अनेक पत्रे देखील उपलब्ध आहेत. त्यातून त्यांचे विचार लेखनावरची निष्ठा यांचं दर्शन घडतं. एका ठिकाणी मंटो लिहितात, 'माझं मन इतकं विटून गेलं आहे

की, आपलं सारं लिखाण जाळून टाकावं आणि ज्याचा नैतिकतेशी काहीही संबंध नाही, ज्याच्यावर कायद्याचे रखवालदार आणि शांतता आणि सुव्यवस्थेचे ठेकेदार प्रहार करू शकणार नाहीत असा एखादा धंदा सुरू करावा, असं मला वाटतं. जकात खात्यात नोकरी धरावी, भरपूर लाच खावी आणि आपल्या मुला-बाळांचं पोट भरावं, कुणावर टीका करू नये, कुणाची कुलंगडी बाहेर काढू नयेत, कोणत्याही प्रश्नावर मतप्रदर्शन करू नये, असे विचार माझ्या येत होते. एका विचित्र मन:स्थितीतून मी जात होतो. काही लोकांची अशी समजूत झाली की, अश्लील गोष्टी लिहून स्वत:वर खटले भरवून घेणं हा माझा पिढीजात धंदाच आहे. काही लोकांचं म्हणणं असं की, सवंग ख्याती मिळवण्यासाठीच मी लिहीत असतो आणि लोकांच्या भावना भडकवून पैसे मिळवतो. खरं म्हणजे आतापर्यंत माझ्या कथांबद्दल चार खटले झालेले आहेत. या खटल्यांमुळे माझं कंबरडं कसं मोडून गेलंय ते माझं मलाच माहीत. माझी आर्थिक स्थिती आधीच वाईट होती. त्यात पुन्हा आसपासच्या वातावरणाने मला निष्क्रिय, निराश बनवून टाकलं, तेव्हा ती स्थिती जास्तच खालावली.'

एका पत्रात (नोव्हें १९३८) त्यांनी लिहिलं होतं, 'पतिव्रता स्त्रिया आणि प्रामाणिक बायकांबद्दल खूप काही लिहिलं गेलं आहे. आता असं लिहिणं व्यर्थ आहे. जी स्त्री आपल्या पतीच्या बाहुपाशातून निघून परपुरुषाच्या बाहुपाशात विसावते आणि तिचा पती त्याच खोलीत बसून हे सगळं पाहतोय, अशा स्त्रीविषयी का लिहिलं जाऊ नये? जीवन जसं आहे तसच रेखाटलं जायला हवं - जसं होतं तसं नाही - किंवा जीवन कसं असेल, कसं असावं याबद्दल लिहायला हवं.'

एका पत्रात ते लिहितात - 'खरे म्हणजे मी खूप थकलोय, मी काय विचार करायला हवा, याचाच मी विचार करतोय. माझं शरीर थकतय. लिहिताना लेखणीतूनही कळा येताहेत असं वाटतंय.'

अशा या मंटो यांच्या कथा इतक्या धारदार, अद्‌भूत आणि विचित्र आहेत की, त्यामुळेच कायमच्या स्मरणात रहातात. अशा कथा लिहिण्यासाठी लेखकाच्या अंगी धाडस असावं लागतं. समाजाचा रोष पत्करण्याची हिंमत असावी लागते. त्याचबरोबर त्या लेखकाला सूक्ष्म दृष्टी, वास्तवाची जाण आणि टोकाची कलात्मकता दाखवावी लागते. हे सगळे गुण मंटोमध्ये होते.

त्यांच्या कथेतून 'करुणेचा झरा' वाहताना दिसतो आणि त्यामुळेच त्यांच्या कथांना वैश्विक स्वरुप मिळतं.

प्रा. चंद्रकांत भोंजाळ
१ (तळमजला), सहकारशिल्प,
आझाद नगर क्रॉस रोड नं. ३,
वीरा देसाई रोड, अंधेरी (प.),
मुंबई - ४०० ०५८.

•••

**ऑगस्ट २००३**

| | | |
|---|---|---|
| २ | - | नागपंचमी |
| ११ | - | नारळीपौर्णिमा |
| १२ | - | रक्षाबंधन |
| १५ | - | स्वातंत्र्यदिन |
| २० | - | गोपाळकाला |
| २१ | - | पतेती |
| २७ | - | मातृदिन |
| ३० | - | हरितालिका |
| ३१ | - | गणेशचतुर्थी |

# लंडनमधील सावरकर दर्शन

*विद्या प्रसारक मंडळाच्या भावे व्याख्यानमालेत डॉ. आगरकर यांचे चित्र पारदर्शिकांच्या आधारे झालेले भाषण ऐकले. अतिशय माहितीपूर्ण अशा भाषणावर 'ऑगस्ट' या विशेष महिन्यासाठी त्यांनी लेख आणा अशी विनंती मंडळातर्फे मी केली. तो हा लेख - संपादक*

इंग्लंडला यायला निघण्यापूर्वीच लंडनला गेल्यावर काय काय पाहायचे याचा सल्ला मला अनेकांनी दिला. इथे आल्यावर देखील तीच यादी पुन्हा ऐकण्यात आली. त्यानुसार एका ब्रिटीश माणसाबरोबर लंडनला जाऊन बकिंगहॅम पॅलेस, वार म्युझियम, ग्रिनीचचे संग्रहालय, टॉवर ऑफ लंडन, टॉवर संग्रहालय, पिकॅडीली सर्कस अशा स्थळांना भेटी देऊन आलो. त्यानंतर माझी भेट श्री. वासुदेव गोडबोले नावाच्या अवलियाबरोबर झाली. हे गृहस्थ व्यवसायाने इंजिनिअर आहेत आणि भारतातून आलेल्या पर्यटकांसाठी लंडनदर्शन करतात. मी लंडन पाहिलेच होते. त्यामुळे पुन्हा पाहण्याची इच्छा नव्हती. परंतु त्यांनी सांगितलेली स्थळे ऐकून माझे कुतुहल जागे झाले. मी वर सांगितलेल्या प्रेक्षणीय स्थळांपैकी एकही स्थळ त्यांच्या यादीत नव्हते त्यांची यादी संपूर्णपणे वेगळी होती. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात ज्या ज्या महान व्यक्तींनी पुढाकार घेतला. त्यांच्या राहण्याची आणि शिक्षणाची स्थळे प्रामुख्याने त्यांच्या यादीत होती. मी माझा होकार दिला. माझ्याप्रमाणेच आणखी दोघेजण या सहलीत सामील झाले. सकाळी ९ ते संध्याकाळी ६ अशा ९तासाच्या अवधीत आम्ही अनेक महत्वाच्या स्थळांना भेटी देऊ शकलो. प्रत्येक ठिकाणी थांबून श्री. गोडबोले आम्हाला त्या ठिकाणाचे वैशिष्ट्य आणि महात्म्य समजावून सांगत. मागील २५ वर्षे माहिती गोळा करुन त्यांनी एक फाईलच तयार केली आहे. त्यांच्या कडून मिळालेल्या माहितीच्या आधारे लंडनदर्शनचा हा आगळावेगळा गोषवारा वाचकांसाठी सादर करीत आहे.

१. **१८५ नॉर्थ गोवर स्ट्रीट** : लंडन दर्शनाची सुरुवात युस्टन स्क्वेर स्टेशन पासून झाली. या स्टेशनच्या अगदी जवळ गोवर स्ट्रीटवर १८५ क्रमांकाचे घर स्वातंत्र्यवीरांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे. या घरी प्रसिद्ध इटालियन स्वातंत्र्यसेनानी जोसेफ मॅझिनी राहात असत. त्याने आपल्या देशाला आस्ट्रियाच्या ३०० वर्षाच्या गुलामगिरीतून मुक्त केले. मॅझिनीच्या जीवनाचा स्वातंत्र्यवीर सावरकरांवर चांगलाच परिणाम झाला. त्यांनी माझिनीचे चरित्र लिहिले. या पुस्तकावर इंग्रज सरकारने १९०८ मध्ये बंदी घातली होती.

२. **युनव्हर्सिटी कॉलेज लंडन** : युस्टन स्क्वेअर स्टेशनच्या गोवर स्ट्रीटवरच युनिव्हर्सिटी कॉलेज लंडनची भव्य दगडी इमारत आहे. याच कॉलेजमध्ये १९०६-०९ या कालावधीत मदनलाल धिंग्रा शिकत होते. सिव्हिल इंजिनिअरिंग डिप्लोमा कोर्स त्याने जवळजवळ पूर्ण केला होता. त्याच्या आधारावर सुखाचे जीवन त्याला जगता आले असते. परंतु देशभक्तीची आग त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. ब्रिटीश गुप्तहेरसंघटनेचे प्रमुख सर कर्झन वायली याचा १ जूले १९०९ रोजी खून करून त्याने फासावर जाणे पसंत केले.

३. **६० मुसवेल हिल रोड** : हे शामजी कृष्ण वर्मा या देशभक्ताचे राहण्याचे ठिकाण. श्री. वर्मा पंडीत होते, तसेच बॅरिस्टरही होते. रतलाम, उदयपूर, जुनागड राज्याचे दिवाण म्हणून त्यांनी काही काळ काम केले. १८९७ मध्ये ते लंडनला आले. त्यांनी भारतीय होम रुल लिगची स्थापना केली आणि इंडियन सोशिओलॉजिस्ट नावाचे मासिक सुरु केले. या मासिकावर इंग्रज सरकारने बंदी लादली. श्री. एस. के. शर्मा यांचे अतिशय महत्त्वाचे कार्य म्हणजे भारतीय विद्यार्थ्यांसाठी स्वस्त वसतिगृहाची

निर्मिती. ते वसतिगृह या घरापासून जवळच आहे. तेथे आमचे पाय वळले.

४. **६५ क्रॉमवेल एव्हेन्यू :** क्रॉमवेल एव्हेन्यूवर ही इमारत अजूनही दिमाखात उभी आहे. श्री. एस. के. वर्मा यांनी ही इमारत विकत घेतली आणि दादाभाई नौरोजी यांच्या हस्ते तिचे उद्घाटन केले. ही इमारत इंडिया हाऊस म्हणून ओळखली जात असे. भारतातून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांचे हे आश्रयस्थान होते. त्या काळात एका पौंडात एका आठवड्याची राहण्याची व खाण्याची सोय केली जात असे. अशी माहिती गोडबोले यांनी दिली.

शामजी कृष्ण वर्मा यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांना लंडनमधे शिकण्यासाठी शिष्यवृत्ती दिली. ही शिष्यवृत्ती घेऊन १९०६ मध्ये सावरकर लंडनला आले. त्यानंतर तीन वर्षे ते याच वसतिगृहात राहिले. वसतिगृहापासून जवळच असलेल्या न्यायसंस्थामध्ये सावरकर शिक्षण घेत असत. सावरकरांच्या जन्मशताब्दीच्या वेळेस श्री. गोडबोले आणि त्यांच्या मित्रपरिवाराच्या प्रयत्नाने या इमारतीवर फलक लावण्यात आलेला आहे. त्यावर लिहिले आहे : Great Patriot and Philosopher Vinayak Damodar Savarkar lived here 1906-1909.

५. **पेंटनविल जेल :** भुयारी रेल्वेने प्रवास करून आम्ही एका शांत परिसरात गेलो. एका दगडी इमारतीकडे बोट दाखवून गोडबोलेंनी आम्हाला सांगितले ते बघा पेंटनविल जेल. जेल सारखा जेल, त्यात काय बघायचे असे मला वाटते. परंतु या जेलला भारतीयांच्या दृष्टीने चांगलेच महत्त्व आहे हे क्षणातच लक्षात आले. कर्झन वायलीला मारल्याबद्दल मदनलाल धिंग्राला याच जेलमध्ये फाशीची शिक्षा देण्यात आली. मदनलालचे हिंदू संस्कृतीप्रमाणे अंत्यसंस्कार करावेत अशी त्यांच्या मित्रांची इच्छा होती. परंतु त्यांची विनंती सरकारने धुडकावून लावली. मदनलालचा मृतदेह कॉफीनमध्ये घालून जेलच्या परिसरात त्याला पुरण्यात आले. डिसेंबर १९७६ मध्ये म्हणजे तब्बल ६७ वर्षांनंतर ह देह तिथून काढून भारतात नेण्यात आला व तिथे हिंदू पद्धतीप्रमाणे अंत्यसंस्कार करण्यात आले.

याच जेलमध्ये उधमसिंग याला ३१ जुलै १९४० रोजी फासावर लटकवण्यात आले. जालीयनवाला बाग हत्याकांडानंतर त्यावेळच्या पंजाबच्या गव्हर्नरचा (म्हणजे मायकेल ओडायरचा) उधमसिंगाने खून केला. त्या वेळी देखील इंग्रज सरकारने उधमसिंगचा मृतदेह कॉफीनमध्ये घालून जेलच्या आवारात पुरला. १९७४ मध्ये हा देह भारतात पाठवण्यात आला.

६. **ब्रिटीश संसद :** लोकशाहीची परंपरा इंग्लंडमध्ये अनेक वर्षांपासून अस्तित्वात आहे. हाऊस ऑफ लार्डस आणि हाऊस ऑफ कामनस् अशा दोन संस्थांमार्फत देशाचा कारभार सांभाळला जातो. वेस्टमिनिस्टर पॅलेस नावाच्या इमारतीत त्यांची अधिवेशने भरतात. प्रसिद्ध बिग बेन घड्याळ याच इमारतीवर आहे. थेम्स नदीच्या तीरावर उभी असलेली ही इमारत भारतीयांच्या दृष्टीने खूपच महत्त्वाची आहे. अनेक वर्षे भारताचे भवितव्य याच भवनात ठरत असे. देशाच्या स्वातंत्र्याविषयी आस्था बाळगणारे अनेक भारतीय विद्वान या भवनात येऊन गेले. भारतीय होम रूल लिग बद्दल आपले मत मांडण्यासाठी लोकमान्य टिळक या भवनात ६ ऑगस्ट १९१९ रोजी आले होते. त्याआधी २० जुलै १९०६ रोजी भारतीय बजेटवर होणारी चर्चा ऐकण्यासाठी वीर सावरकर येथे येऊन गेले. हे औचित्य साधून सावरकर स्मृती समितीने त्यांच्या जन्म शताब्दीच्या वेळेस या भवानात एक कार्यक्रम आयोजित केला होता. पंडित जवाहरलाल नेहरु, महात्मा गांधी या पुढाऱ्यांनीदेखील या भवनाला भेट दिली होती.

७. **विदेश कार्यालय :** ब्रिटीश संसदेच्या जवळच किंग्ज चार्लस् स्ट्रीटवर विदेश आणि कॉमनवेल्थ कार्यालयाची इमारत आहे. या इमारतीला इंडिया ऑफिस म्हणून संबोधले जात असे. इस्ट इंडिया कंपनीकडून भारताचा कारभार जेव्हा इंग्लंडच्या राणीच्या ताब्यात आला

तेव्हापासून स्वातंत्र्यापर्यंत देशाचा संपूर्ण कारभार याच इमारतींमधून चालत असे. याच इमारतीत मोठे वाचनालय होते. तेथे भारतासंबंधीचे सर्व कागदपत्र उपलब्ध होती. कालांतराने हे वाचनालय इंडिया हाऊसमध्ये स्थलांतरित करण्यात आले. वाचनालयातील संदर्भ ग्रंथ वाचण्यासाठी सावरकर इंडिया ऑफिसमध्ये नियमितपणे येत असत.

८. **इंडिया हाऊस :** ८ जुलै १९३० रोजी पंचम जॉर्ज आणि क्वीन मेरी यांच्या हस्ते या इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. या इमारतीत सध्या भारतीय उच्चायुक्ताचे कार्यालय आहे. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यावर देवनागरी लिपीमध्ये 'भारत' अशी पाटी या इमारतीवर लावण्यात आली. त्याचबरोबर उर्दूमध्ये 'हिंदोस्ता' अशी पाटी लावण्यात आलेली आहे. साधारणपणे ४० फूट उंचीवर रॉयल ब्रिटीश चिन्ह अजूनही शाबूत असल्याचे दिसते.

९. **कॅक्स्टन हॉल :** गल्लीबोळातून वाट काढीत आम्ही एका इमारतीजवळ पोहोचलो. त्या इमारतीच्या भोवताली लोखंडी पाईपांचा सांगाडा उभारलेला होता. एकूण परिस्थिती पाहता इमारत दुरुस्तीचे काम चालले असावे याची आम्हाला कल्पना आली. मध्य लंडनमधील अनेक इमारती जुन्या झाल्या असल्याने त्यांची डागडुजी करण्यात येत आहे. दुरुस्ती करताना इमारतीच्या मूळच्या कलाकुसरीला धक्का बसणार नाही याची काळजी घेतली जाते. जुन्या वस्तू जपून ठेवण्यात इंग्रज चांगलेच वाकबगार आहेत.

डागडुजी होत असलेल्या इमारतीत एक मोठे सभागृह आहे. हे सभागृह म्हणजे भारतीय स्वातंत्र्यवीरांचे भेटण्याचे ठिकाण. अनेक विषयांवर येथे वादविवाद होत असत. महत्वाचा प्रसंग असेल तर येथे सभा घेण्यात येत असे. धिंग्राने कर्झन वायलीचा खून केल्यावर येथे सभा घेण्यात आली. त्यात धिंग्राचा निषेद करण्यात आला. या ठरावाला स्वातंत्र्यवीर सावरकरांनी विरोध दर्शविला होता हे येथे नमूद करावेसे वाटते. रोलट ॲक्ट आणि जालियनवाला बाग हत्याकांडाचा निषेध दर्शविण्यासाठी येथे सभा घेण्यात असली होती. अशा अनेक महत्वाच्या सभांची स्मृती सांभाळत कॅक्स्टन हॉल उभा आहे.

१०. **१९१-१९५ पिकॅडिली :** नऊ वेगवेगळ्या स्थळांना भेटी देण्यात वेळ कसा गेला कळलेच नाही. सूर्य मावळायला लागला होता. आणखीही अनेक ठिकाणे पाहायची होती परंतु लंडन दर्शन आटोपते घेणे आवश्यक होते. एकत्र विचार करुन दहाव्या स्थळाला भेट देण्याचे आम्ही ठरवले. इमारतीजवळच पोहोचताच त्यावरील कलाकुसरीने आमचे लक्ष वेधून घेतले. १९७१ पर्यंत ही इमारत रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ पेंटर्स इन वाटरकलर या संस्थेच्या ताब्यात होती. या इमारतीचे आपल्या दृष्टीने महत्त्व असे की नोव्हेंबर १८८५ आणि मे १८९६ या काळात स्वामी विवेकानंदानी येथे व्याख्याने दिली होती. स्वामी विवेकानंदाची शिष्या मार्गारेट नोबल त्यांना इथेच भेटली. तिचेच नामकरण भगिनी निवेदिता असे करण्यात आले.

मॅझिनी या क्रांतीकारकाच्या राहत्या घरापासून सुरु होऊन स्वामी विवेकानंदाच्या भाषण स्थळापाशी आमचे लंडनदर्शन थांबले. खरे तर थांबवावे लागले. मदनलाल धिंग्रा, वल्लभभाई पटेल, लोकमान्य टिळक यांचे राहते घर. जेथे धिंग्राने कर्झन वायलीला गोळ्या घातल्या ते इंपिरियल कॉलेज, सावरकरांना अटक करुन ज्या पोलीस कस्टडीत ठेवण्यात आले ते ठिकाण अशा अनेक ठिकाणांना भेटी देण्याचे राहून गेले. पुन्हा एकदा लंडनदर्शन आयोजित करून या स्थळांना नक्की भेट देऊ या असा निर्णय करून आम्ही आपापल्या वाटेला लागलो. चौघांच्या वाटा खरोखरच चार दिशेला होत्या. त्या परत भेटण्याची मी वाट पाहात आहे.

**डॉ. सुधाकर आगरकर**
कल्याण, जि. ठाणे.

•••

# परिसर वार्ता

## जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेतर्फे गुरुपौर्णिमा उत्सव साजरा

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटना 'सर्ज' तर्फे माजी विद्यार्थी संघटनेच्या स्थापनेच्या वर्ष वाढदिवसाचे औचित्य साधून थोरले बाजीराव पेशवे सभागृहात गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या महोत्सवासाठी राजकीय, शैक्षणिक, उद्योग क्षेत्रातील अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर प्राचार्य स. वा. गोखले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर 'सर्ज' या माजी विद्यार्थी संघटनेचे कार्याध्यक्ष महेश माडखोलकर, विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. वि. करंदीकर, उपप्राचार्य अशोक वडगुजर, उपप्राचार्या शोभा दोशी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका अनघा देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व पाहुण्यांचे व प्राध्यापकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले व गौरी खाडीलकर या विद्यार्थिनीने गुरुवंदनेने गुरुजनांना अभिवादन केले.

आपल्या भाषणात डॉ. बेडेकर यांनी या संघटनेची भरभराट होवो व सर्व माजी विद्यार्थी जास्तीत जास्त सदस्य होवोत अशी 'सर्ज'ला शुभेच्छा देऊन या संघटनेतर्फे भविष्यात अनेक चांगले उपक्रम राबविले जातील अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्राचार्य स. वा. गोखले यांनी 'सर्ज'मध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करून घेऊन त्यांचा महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी कसा उपयोग करून घेता येईल याचा विचार करणे गरजेचे आहे असे सांगितले. त्याचबरोबर माजी विद्यार्थ्यांच्या संघटनेबरोबरच महाविद्यालयाच्या माजी कर्मचाऱ्यांचीही संघटना स्थापन करण्याची कल्पना मांडली व त्या दिशेने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. प्राचार्य स. वा. गोखले यांनी यावेळी 'सर्ज' या संघटनेसाठी देणगी म्हणून रुपये १,१११ चा धनादेश 'सर्ज'चे कार्याध्यक्ष महेश माडखोलकर यांच्याकडे सुपूर्द केला. त्यानंतर महेश माडखोलकर यांनी माजी विद्यार्थी संघटनेच्या भविष्यातील उपक्रमांविषयी उपस्थितांना माहिती दिली.

त्यानंतर काही माजी विद्यार्थ्यांचा परिचय करून देण्यात आला तसेच काही माजी विद्यार्थ्यांनी आपल्या आपल्या कलागुणांचा प्रत्यय करून देणारे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सौ. प्रियवंदा टोकेकर यांनी तर सूत्रसंचालन प्रा. सौ. राणी अग्निहोत्री यांनी केले.

## 'विद्यार्थी बनून अभ्यास करा, परीक्षार्थी नाही'

'विज्ञानाचा अभ्यास करावयाचा असेल तर विद्यार्थ्याने विद्यार्थी बनूनच करायला हवा. परीक्षार्थी बनून नव्हे, कारण विषयाचा परिपूर्ण आवाका, त्यातून येणारा आत्मविश्वास हा विद्यार्थी असेल तरच अनुभवता येतो', असे उद्गार भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरचे वैज्ञानिक डॉ. एस.के. पाटील यांनी ठाणे महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात बोलताना काढले. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र मंडळाच्या या शैक्षणिक वर्षातील उपक्रमांचे उद्घाटन करताना प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पाटील बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सी. जी. पाटील होते.

मूलद्रव्यांचा इतिहास, आवर्तसारिणीतील त्यांची मांडणी व वर्गीकरण या विषयावर बोलताना डॉ. पाटील यांनी चित्रपारदर्शिकांचे प्रक्षेपण केल्याने विषय अधिक सुलभपणे मांडला गेला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस रसायनशास्त्र विभाग प्रमुख व रसायनशास्त्र मंडळाचे प्रमुख प्रा. स. ग. मेढेकर यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. सौ. मीरा अकोलकर यांनी तर डॉ. अतुल वेडेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

कार्यक्रमास पदवी विभागाच्या उपप्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर, रसानशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते. आभार प्रदर्शन. कु. ट्रेसो डिसोझा हिने केले.

## 'पालवी' - एक देखणे प्रदर्शन

नभी घनदाट मेघ एकत्र आले आणि त्या पाठी सूर्य दिसेनासा झाला. त्या काळ्या मेघातून अचानक लखकन् एक वीज चमकली आणि मेघांनी जलधारांचे रूप घेतले. धनघोर पाऊस या सृष्टीवर वर्षावला. पावसाच्या थंडाव्याने सृष्टी विसावली आणि नंतर झाडाला सुंदर, कोमल, हिरवी 'पालवी' फुटली.



प्रदर्शन पाहताना डॉ. करमरकर, डॉ. अंबिके व प्रा. मकरंद दीक्षित सोबत मीनल व अनुजा

वरच्या नैसर्गिक क्रियेप्रमाणे आधी सृष्टी या विचाराचा मेघ आमच्या वनस्पतीशास्त्र विभागात आला. आमच्या विभागप्रमुख आणि माजी विद्यार्थी यांच्या विजेसारख्या क्रियेने आणि त्यांच्या कष्टांच्या व प्रयत्नांच्या पावसाने सृष्टी Botany Club तयार झाला. या वर्षी आम्ही या सृष्टीत आणखी नवी भर घालून 'पालवी' नावाचे एक नवीन प्रदर्शन मांडले.

पालवी प्रदर्शन उभारण्याचे काम गेले ८-१० दिवस चालले होते. आम्ही सर्व तृतीय व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी एकजुटीने कार्याला लागलो होतो. जो तो प्रदर्शन कसे चांगले उभे राहील या जिद्दीला पेटला होता. कधी महाविद्यालयात लवकर यायचो तर कधी घरी उशीरा जायचो. Project वर काम करताना वेदना जरी चेहऱ्यावर दिसल्या तरी Project पूर्ण झाल्यावर त्या वेदना पडद्याआड होऊन नुसता आनंदच चेहऱ्यावरती झळकायचा. या धडपडीत, या आनंदात प्रदर्शन उभं राहिलं.

प्रदर्शनासाठी मुख्य पाहुणे म्हणून मा. डॉ. करमरकर आणि मा. डॉ. व्ही.व्ही. अंबिके यांना आमंत्रित करण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन मा. डॉ. करमरकर यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. प्रदर्शनात एक प्रकारचे आनंदाचे वातावरण पसरले होते तसे असले तरी आम्हा सर्व कार्यकर्त्यांच्या मनात दडपणच होते. डॉ. करमरकर यांना वनस्पतीशास्त्राचे आधुनिक पितामह म्हटले जाते. यांनी वनस्पतीशास्त्रात भरपूर काम केलेले आहे. सध्या ते जैविक तंत्रज्ञान शास्त्र या विषयावर कार्यरत आहे. विशेष म्हणजे आमचे गुरु डॉ. अंबिके, डॉ. मुळगावकर, प्रा. दिक्षित आणि प्रा. शहा यांचेही ते गुरु आहेत.

डॉ. अंबिके म्हणले आमचे माजी विभाग प्रमुख आणि आमचे गुरु डॉ. अंबिके यांनी आम्हाला अभ्यास आणि Taxonomy यामध्ये नेहमीच मदत केली असल्यामुळे आम्ही त्यांना कधीच विसरू शकत नाही.

उद्घाटन झाल्यानंतर शीतल शेंडे हिने सरस्वती वंदना सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी टेकाळे हिने केले. उद्घाटन आणि गुरुपौर्णिमेचे निमित्त साधून आम्ही आमच्या सर्व गुरुंची आराधना केली आणि त्यांचे आशिर्वाद घेतले. त्याच वेळेस मानसी दांडेकर हिने गुरुंचे महात्म्य वर्णन करणारे गीत सादर केले. त्यानंतर डॉ. करमरकर यांनी आपल्या भाषणास सुरुवात केली. वनस्पतीशास्त्रात पदवी प्राप्त केल्यानंतर पुढे काय शिकावे किंवा व्यावसायिकदृष्ट्या ही पदवी कशी महत्त्वाची ठरते याचा उलगडा त्यांनी सहजपणे केला. फुले व फळे उत्पादन क्षेत्रात कसा विकास होत आहे, काय नवीन संशोधन होत आहे आणि भारताची या क्षेत्रातील भूमिका याबाबत सविस्तर माहिती दिली. जैविक तंत्रज्ञान शास्त्र याची राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील माहिती आणि त्याचे व्यावसायिकीकरण याची माहिती दिली. भारत या क्षेत्रात शैक्षणिक आणि व्यावसायिकदृष्ट्या कितपत अग्रेसर आहे आणि भारताला या क्षेत्रात किती विकास केला पाहिजे याची आम्हाला जाणीव करून दिली. आमचे प्राचार्य आणि उप्राचार्य यांनी आपल्या भाषणाद्वारे आमच्या कला व प्रदर्शनाचे कौतुक केले. आभार प्रदर्शन बतुल नगरवाला हिने केले आणि उद्घाटन सोहोळा संपन्न झाला.

आमचे प्रदर्शन अनेक निरनिराळ्या स्टॉल्सनी आणि चार्टस्‌नी नटलेले होते. आत येतानाच बगिच्याचे मॉडेल होते. हा स्टॉल मानसी दांडेकर, प्रभा सरवणकर आणि शीतल शेंडे या सांभाळत होत्या. हे मॉडेल प्रेक्षकांना खूपच आवडले. त्याच्या शेजारी पुस्तकांचे लहानसे प्रदर्शन मांडले होते. वनस्पती शास्त्र आणि नर्सरी या विषयांची पुस्तके मांडण्यात आली होती. हा स्टॉल विद्या थरकार सांभाळत होती. माजी विद्यार्थ्यांचे सुंदर हर्बेरियम व प्रोजेक्ट मांडण्यात आले होते. हा स्टॉल सोफिया अब्दुल रहिम हिने सांभाळला होता. त्यानंतर सुंदर टेरॅरियम ठेवण्यात आले होते. दोन ग्रीनहाऊस ठेवण्यात आले होते. त्यापैकी एक नुपुरा भागवतचे व एक केदार कुलकर्णीचे होते.

एका स्टॉलमध्ये निरनिराळ्या वनस्पतींपासून तयार केलेली पेये मांडण्यात आली होती. हा तहान भागवणारा स्टॉल अनुजा चव्हाण सांभाळत होती. सौंदर्यवाटिका असा एक स्टॉल होता. यात निरनिराळ्या प्रकारच्या त्वचेची निगा कशी राखावी याची माहिती दिली होती तसेच काही आयुर्वेदिक औषधेदेखील मांडण्यात आली होती. हा स्टॉल रेश्मा गौरखेडे, नाझिया खलिफे आणि शैलेश यादव यांनी सांभाळला. त्यानंतर सुंदर फुलांची पद्धतशीर आणि कलात्मकरित्या मांडणी शमिका खानविलकर हिने केली होती. Aroma therapy या स्टॉलमध्ये निरनिराळ्या वनस्पतींच्या सुवासिक तेलांच्या बाटल्या ठेवण्यात आल्या होत्या व प्रत्येक तेलाचे गुण लिहिण्यात आले होते व हा स्टॉल कल्याणी आव्हाड सांभाळत होती. आपल्या बनातून उपलब्ध होणाऱ्या निरनिराळ्या उत्पादनांचे एक स्टॉल मांडण्यात आले होते. ज्यामध्ये मध, मेण, बांबूंच्या वस्तू इत्यादी मांडण्यात आले होते. हा स्टॉल मारीया खान सांभाळत होती. जैविक तंत्रज्ञान शास्त्र यातील एक शाखा म्हणजे Plant tissue culture याबद्दल माहिती देणारा स्टॉल होता. जो योगिता व प्रणाली सांभाळत होत्या. वनस्पतीमधून तेल कसे काढण्यात येते त्याची माहिती आणि प्रक्रियेत लागणाऱ्या उपकरणांची माहिती हर्षाली व साक्षी देत होत्या. एका लहानशा प्लॅस्टिकच्या ट्रेमध्ये मीनल चौधरी हिने सुंदरसे लँडस्केप तयार केले होते. त्यानंतर तोंडाला पाणी आणणाऱ्या आणि शरीरस्वास्थ जपणाऱ्यांच्या मनाला दिलासा देणारा स्टॉल म्हणजे Salad चा स्टॉल होता. तो स्टॉल किर्ती भंगाळे व सोनिया सांभाळत होत्या. या विविध स्टॉल्सनी व भरपूर माहिती देणाऱ्या तक्त्यांनी आमचे प्रदर्शन भरले होते. प्रफुल्ल भगत याने संगणकाद्वारे mushroom बाबत माहिती दिली. लोकांच्या प्रतिक्रिया खूपच सुंदर व उत्स्फूर्त होत्या. प्रेक्षकांनी अशा प्रदर्शनाची पुन्हा मागणी केली आहे.

अशा रीतीने हे नटलेले प्रदर्शन कुठेतरी आमच्या मनात आठवणीच्या रूपात घर करून बसलेले आहे. त्याचे सारे श्रेय आम्ही आमच्या विभाग प्रमुख डॉ. मेधा मुळगांवकर, आमचे प्राध्यापक डॉ. नागेश टेकाळे, प्राध्यापक मोझेस कोलेट, प्राध्यापिका सौ. सहा, डॉ. जमदाडे आणि अर्थात न विसरता आमचे ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक यांना देतो.

वृत्त : मीनल चौधरी, अनुजा चव्हाण, विद्या थरकार

शब्दांकन : केतन कांबळे

## संकल्पदिन साजरा

दि. १/७/२००३ रोजी डॉ. बेडेकर विद्यामंदिर प्राथमिक विभाग, नौपाडा, ठाणे येथे प्राथमिक विभागातर्फे अंधारातून प्रकाशाकडे नेणारी स्फूर्तीज्योत 'हेलन केलर'चा स्मृतिदिन व २७ जून रोजी असलेल्या जन्मदिवसानिमित्त शासनाने राबवलेल्या 'अपंगांचे एकात्म शिक्षण विशेष शैक्षणिक कार्यक्रमाचा' भाग म्हणून 'संकल्पदिन' साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे विशेष म्हणजे याच शाळेतील एक कर्मचारी व पालक श्रीयुत सुरेश ठाकूर यांचा मुलगा चि. अमित ठाकूर हा अंध असूनही याने या वर्षीच्या शालान्त परीक्षेस ५५% गुण मिळवून स्पृहणीय यश संपादन केले आहे. त्याचा व त्याला शिकविणाऱ्या त्याच्या अध्यापिका मृणाल शरद बेल्ले, त्याचे आई-वडिल यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्याबरोबर याच शाळेतील शारीरीक विकलांग असणाऱ्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. निसर्गाने दिलेल्या अपंगत्वावर मात करून आपण आपले जीवन सुलभ व आनंदी करू शकतो हेच त्याचे जिवंत उदाहरण आहे. तसेच इ. ३ री व ४ थीच्या विद्यार्थ्यांना या संकल्पदिनाचे महत्त्व सांगताना शाळेच्या मुख्याध्यापिकांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात 'अलौकिक व्यक्तिमत्व' हेलन केलरच्या जीवनपटाची थोडक्यात मुलांना माहिती सांगितली तर अमितच्या मुख्याध्यापिका मृणाल बेल्ले यांनी कोणतेही काम करण्यासाठी आत्मविश्वास व जिद्द ही असली पाहिजे व त्याला व अशा अपंग मुलांना मार्गदर्शन करतानाचे येणारे अनुभव आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले.

याच कार्यक्रमात शाळेतील शिक्षिका सौ. मनीषा गोखले, सौ. स्नेहल कुडव व इयत्ता ३री व ४थीचे विद्यार्थी यांनी अमित ठाकूर यांची हसत-खेळत मुलाखत घेतली या कार्यक्रमाचे संयोजन सौ. वैदेही गांगल यांनी केले तर आभारप्रदर्शन सौ. विनोदिनी राणे यांनी केले. या कार्यक्रमास इ. ३री व ४ थीचे सुमारे ५५० विद्यार्थी, इ. १ली ते ४ थीचे पालक प्रतिनिधी विद्याप्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष मा. करंदीकर साहेब व इयत्ता १ ली ते ४ थीच्या सर्व शिक्षिका-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. अमित ठाकूर याला दहावीच्या परीक्षेत रायटर म्हणून मदत करणाऱ्या माध्यमिक विभागातील चि. मंदार कुलकर्णी याचेही सदर कार्यक्रमात कौतुक करण्यात आले. यातून 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरु सुपंथ' अशी मुलांना शिकवण देण्यात आली.

## तंत्रनिकेतन वार्ता

३० जून २००३ रोजी तंत्रनिकेतनाचे वार्षिक निकाल जाहिर झाले. प्राचार्य श्री. मुजुमदार, उपप्राचार्य श्री. नायक, सौ. वडेर, विभागप्रमुख (इ.पी.एस.) यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष व तृतीय वर्षाच्या प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांची यादी पुढीलप्रमाणे आहे.



डावीकडून उभे कु. अमेय ओक, कु. अनिकेत लाड, कु. अमित सतरा, कु. संगीत लोहकर, डावीकडून बसलेले सौ. वडेर (विभागप्रमुख ई.पी.एस्.), उपप्राचार्य श्री. नायक, प्राचार्य श्री. मुजुमदार, सौ. बी. ए. जोशी (ग्रंथालय)

**प्रथम वर्ष**

| | | | |
|---|---|---|---|
| केमिकल | कैलास महाजन | ८१८/१३०० | (६२.९२%) |
| इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टम | वसंत मारुगणनाथन | ८६२/१३०० | (६६.३०%) |
| इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स | वैभव खेर | ११६६/१३०० | (८९.६९%) |
| इन्स्ट्रुमेन्टेशन | पूजा पाटील | ८३८/१३०० | (६४.४६%) |
| इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | विवेक शिंदे | ९४४/१३०० | (७२.६२%) |
| कॉम्प्युटर इंजिनिअरींग | आलोक सकपाल | ७९५/१३०० | (६१.१५%) |

**द्वितीय वर्ष**

| | | | |
|---|---|---|---|
| केमिकल | विनयकुमार डोलकर | ७९८/१०५० | (६६.५%) |
| इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टम | श्रेयस झिंगारे | १०४३/१२५० | (८३.४४%) |
| इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स | निनाद मेहेंदळे | १०५४/१३५० | (७८.०७%) |
| इन्स्ट्रुमेन्टेशन | रोहित वालेचा | १०२१/१३५० | (७५.६२%) |
| इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | आसिम शेख | ८५९/१२०० | (७१.५८%) |

**तृतीय वर्ष**

| | | | |
|---|---|---|---|
| केमिकल | अमित सातरा | ७५२/१०५० | (७१.६६%) |
| इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टम | अमेय ओक | ७४१/१०२५ | (७२.२९%) |
| इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स | संगीत लोहकर | ८३१/१०५० | (७९.१४%) |
| इन्स्ट्रुमेन्टेशन | अनिकेत लाड | ८०७/१०५० | (७६.८६%) |



**वैभव केतन खेर**

वैभव केतन खेर हा विद्या प्रसारक तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्याने प्रथम वर्षात ८९.६९% टक्के गुण मिळवून प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. तो तंत्रनिकेतनातील सर्व कोर्सेस मधूनही प्रथम आला. याशिवाय गेल्या पाच वर्षातील निकालात सगळ्यात अधिक गुण मिळवून त्याने रेकॉर्ड प्रस्थापित केले आहे. गणितातही त्याला १०० पैकी १०० गुण आहेत. यासाठी त्याचे तंत्रनिकेतनातील प्राचार्य उपप्राचार्य आणि सर्व स्टाफतर्फे हार्दिक अभिनंदन ! १०वीतही त्याला ८६% गुण मिळाले होते.

प्राचार्य मुजुमदार यांनी त्याच्या सत्काराच्यावेळी अशी एक विशेष गोष्ट सांगितली की जेव्हा हा विद्यार्थी १०च्या निकालानंतर प्रवेशासाठी तंत्रनिकेतनात आला त्यावेळी त्यांनी त्याला विचारले, 'तू पुढे काय करणार

आहेस?' वैभवने सांगितले, 'जयंत नारळीकरांच्या Astrophysicsच्या संस्थेत जायचे आहे. या संस्थेत प्रवेशासाठी दोन पर्याय आहेत. एक B.Sc./M.Sc. किंवा इलेक्ट्रॉनिक्समध्ये पदवी. १० वी पास झालेला विद्यार्थी Astrophysics मध्ये काहीतरी करून दाखवायचे आहे. प्राचार्य मुजुमदारांना त्याचे खूप कौतूक वाटले. त्यामुळे त्यांनी त्याला पदविका करून पदवी करण्यासाठी प्रोत्साहित केले. या विद्यार्थ्याने त्यामुळे तंत्रनिकेतनात प्रवेश घेतला आहे.

वैभव खेरची महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्यासाठी प्राचार्य मुजुमदार यांनी शुभेच्छा दिल्या.

## 'इंडस्ट्रिअल सेफ्टी'चा शुभारंभ

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातर्फे 'इंडस्ट्रिअल सेफ्टी'चा एक वर्षाच्या महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षणाची मान्यताप्राप्त (MSBTE) असा डिप्लोमा कोर्स दि. १६ जुलै २००३ पासून सुरू झाला आहे.

मुख्य पाहुणे प्रा. डी. एस्. माकोणे, एक्स-सेक्रेटरी, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या हस्ते या



'इंडस्ट्रीयल सेफ्टी'चा शुभारंभ डावीकडून उपप्राचार्य श्री. नायक, प्राचार्य श्री. मुजुमदार, प्रा. डी. एस्. माकोणे (एक्स सेक्रेटरी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई), अध्यक्ष डॉ. वा. वेडेकर, डॉ. आर. एस्. महाशब्दे (एक्स को-ऑर्डिनेटर टेक्निकल टीचर्स ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, पुणे), उपाध्यक्ष श्री करंदीकर

कोर्सचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विशेष निमंत्रित पाहुणे डॉ. आर. एस्. महाशब्दे (एक्स-कोऑर्डिनेटर टेक्निकल टीचर्स ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, एक्स्टेंशन सेंटर, पुणे) हे होते.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, उपाध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर यांनीही उपस्थित राहून नवीन अभ्यासक्रमास शुभेच्छा दिल्या.

प्राचार्य सी. श्री. मुजुमदार यांनी हा अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतची भूमिका सांगितली. या अभ्यासक्रमांतर्गत इंडस्ट्रीत सेफ्टी आवश्यक भाग आहे व ही सुरक्षितता कारखान्यात कोणत्या पद्धतीने वापरली जाते व जावी या संदर्भात माहिती आहेच शिवाय इंडस्ट्रीचे दूषित वायू अथवा अन्य काळजी कशी घ्यावी या संबंधीही माहिती या कोर्समध्ये आहे.

हा अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी असलेली पात्रता अशी आहे - इंजिनिअरिंग डिप्लोमा / डिग्री किंवा बी. एस्. सी. फिजिक्स किंवा केमिस्ट्री शिवाय २ वर्षाचा अनुभव.

इंडस्ट्रित काम करण्याऱ्या प्रत्येकाने सेफ्टी विषयक कोर्स करणे आवश्यक आहे. कारखान्यात काम करताना सुरक्षितता कशी पाळावी व अपघात होऊ नये म्हणून काय काळजी घ्यावी. यासंबंधी प्रत्येकाने जागरुक राहिले पाहिजे व यासाठी सेफ्टी विषयक माहिती या कोर्सद्वारे करून घेणे अत्यावश्यक आहे.

या कार्यक्रमास उपप्राचार्य डी. के. नायक, तंत्रनिकेतनाचा सर्व स्टाफ व ज्या विद्यार्थ्यांनी या कोर्ससाठी प्रवेश घेतला आहे असे सर्व उपस्थित होते. वि.प्र. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी हा कोर्स तंत्रनिकेतनातर्फे सुरू केल्याबद्दल धन्यवाद देऊन अशा नवीन शैक्षणिक संधी उपलब्ध करून द्याव्यात व यासाठी वि. प्र. मं. कायम त्यांच्या पाठिशी आहे, असे आश्वासन दिले.

## शैक्षणिक प्रश्नपत्रिकेच्या दर्जाबाबत कार्यशाळा

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या MIPP तर्फे एक कार्यशाळा दि. १४ जुलै ते १८ जुलै २००३ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातर्फे घेतली गेली.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने ही कार्यशाळा वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनास घेण्याची परवानगी दिली हा तंत्रनिकेतनास मिळालेला बहुमानच आहे. या कार्यक्रमाचे अधिकारी म्हणून प्राचार्य सी. श्री. मुजुमदार व उपप्राचार्य डी. के नायक यांनी आयोजन केले. याशिवाय सौ. कीर्ती आगाशे (इनचार्ज-इलेक्ट्रॉनिक्स), सौ. उषा राघवन (इनचार्ज-आय. एफ/सी.ओ.), सौ. व्ही.ए. जोशी (इनचार्ज इन्स्ट्रुमेंटेशन) यांच्या सहकार्याने ही कार्यशाळा उत्तमरित्या यशस्वी झाली.



डावीकडून प्राचार्य मुजुमदार प्रा. डी. एम्. माकोणे (प्रोजेक्ट ऑफिसर महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई) प्रा. बी. पी. टाळे (डायरेक्टर महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई), डॉ. आर. एस. महाशब्दे (T. T. T. I., पुणे), उपप्राचार्य श्री. डी. के. नायक

शैक्षणिक दर्जा कायम असावा, नवनवीन कल्पना एकत्रित याव्यात, नव्या तऱ्हेचे प्रश्न विद्यार्थ्यांना समजावेत व सर्व शैक्षणिक प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना आकलन होईल असे प्रश्न असावेत शिवाय परिक्षेच्या वेळी प्रश्नपत्रिका संगणकाद्वारे असावी अशी विशेष भूमिका ह्या कार्यशाळेत समोर ठेऊन त्या दृष्टीने आपल्या तंत्रनिकेतनाचे प्राध्यापक व इतर तंत्रनिकेतनाचे प्राध्यापक व विभागप्रमुख यांनी एकत्रित येऊन शैक्षणिक प्रश्नात नवीन संकल्पना कशा याव्यात, दर्जेदार प्रश्नपत्रिका कशी असावी यासंबंधी चर्चा केली.

या कार्यशाळेच्या सांगता कार्यक्रमास प्रा. बी. पी. टाळे (डायरेक्टर - महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच डॉ. आर. एस्. महाशब्दे (T.T.T.I., पुणे) व प्रा. डी. एम्. माकोणे (प्रोजेक्ट ऑफिसर, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई) यांनीही उपस्थित राहून प्राध्यापक वर्गाशी संवाद साधला.

प्राचार्य मुजुमदार यांनी थोडक्यात तंत्रनिकेतनाची माहिती सांगितली. प्रा. सौ. आगाशे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. उपप्राचार्य श्री. नायक यांनी या कार्यशाळेबाबत थोडक्यात माहिती दिली.

कार्यशाळेस उपस्थित असलेल्या इतर तंत्रनिकेतनातील प्राध्यापक प्रतिनिधींनी त्यांचे दृष्टिकोन व्यक्त केले.

या कार्यक्रमास तंत्रनिकेतनातील सर्व स्टाफ व कार्यशाळेतही इतर तंत्रनिकेतनातील हजर असलेले प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संकलित

**लेख / वर्गणी / जाहिराती पाठविण्यासाठी पत्ता**

संपादक, 'दिशा'
विद्या प्रसारक मंडळ,
नौपाडा, ठाणे.
दूरध्वनी : २५४२ ६२७०